



# कृषीवल

रायगड, शनिवार, दि. २८ सप्टेंबर २०२४

किंमत ४ ₹





# महिलांची एकजूट क्रांती घडवेल

## चित्रलेखा पाटील यांचा विश्वास

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

निवडणुकीत तरुणांसह घरातील प्रमुख मंडळींना दारुच्या आहारी घालविण्याचा प्रकार घडतो. त्याचा नाहक त्रास आई, पत्नी, मुलगी व मुलांना होतो. दारुमुळे कुटुंबं उद्ध्वस्त होतात. दारुचे व्यसन लावून चिखलात लोळवणाऱ्यांना महिलाच त्यांची जागा दाखविणार आहेत. पाणी, रस्त्याचा प्रश्न गंभीर आहे. पण, ठेकेदाराकडून टक्केवारी घेऊन आपली झोळी भरण्याचे काम आमदार करतात, असा आरोप शेतकरी कामगार पक्षाच्या जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी केला. हे आपल्याला थांबवायचे असून, पुढचा आमदार कोण असणार हे महिलाच ठरविणार आहेत. महिलांची एकजूट एक वेगळी क्रांती घडविणार, असा विश्वासही चित्रलेखा पाटील यांनी व्यक्त केला.

रायगड जिल्हा महिला बचतगट फेडरेशन पुरस्कृत 'लेक शिवबा'ची अंतर्गत शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने महिला संवाद मेळाव्याचे आयोजन सहाण बायपास येथील पांडुरंग मानकर यांच्या पान २ वर

**'लेक शिवबा'ची संवाद मेळाव्यास हजारोंच्या संख्येने महिलांची उपस्थिती**

### कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

महिला संवाद मेळाव्याच्या निमित्ताने पंचक्रोशीतील तीसहून अधिक कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला. राजकीय, सामाजिक, क्रीडा, शैक्षणिक, सहकारी, बँकिंग, सांस्कृतिक अशा अनेक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा सन्मान चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन करण्यात आला. तसेच उपस्थित सर्व महिलांना भेटवस्तू देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

### स्व. मीनाक्षी पाटील यांना श्रद्धांजली

शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या, रायगडच्या रणरागिणी, माजी राज्यमंत्री मीनाक्षी पाटील यांचे राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, पत्रकारिता क्षेत्रात मोलाचे योगदान राहिले आहे. महिला संवाद मेळाव्याच्या निमित्ताने स्व. मीनाक्षी पाटील यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी सर्वांनी उभे राहून त्यांना अभिवादन केले. त्यांच्या कार्याची माहितीही यावेळी देण्यात आली.



● (छायाचित्र : अमोल नाईक)

**उद्याच्या भविष्याची दोरी महिलांच्या हाती**

**विरोधकांना तालावर नाचविण्याची वेळ आलीय**

सविस्तर वृत्त पान २ वर

**आजचा अग्रलेख**
**ही मिजासही उतरेल**

## वेधक

### 'शिवरायांचा पुतळा उभारताना चुका'

**मुंबई :** योग्य पद्धतीने देखभाल न केल्यामुळे अनेक ठिकाणी चढलेला गंज, कमकुवत फ्रेम, सदोष वेल्डिंग आणि चुकीचे डिझाईन या चार प्रमुख कारणांमुळे मालवणमधील राजकोट येथे उभारण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा आठ महिन्यांतच कोसळला, असा ठपका याप्रकरणी नेमलेल्या चौकशी समितीने आपल्या सोळा पानी अहवालात ठेवला आहे. छत्रपतींचा पुतळा उभारताना अक्षम्य चुका झाल्याचे या हवालामुळे स्पष्ट झाले आहे. शिवरायांचा पुतळा २६ ऑगस्ट २०२४ रोजी कोसळला होता.

### सरकारला झापले

**मुंबई :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने तायरीला वेग आला आहे. निवडणूक आयोगाचे अधिकारी राज्याच्या दौऱ्यावर आले आहेत. दरम्यान, आयोगाने सरकारला झापलं आहे. तीनदा सांगूनही अधिकाऱ्यांच्या बदल्या का थांबवल्या? असा सवाल आयोगाने सरकारला विचारला आहे. निवडणूक अधिकाऱ्यांनी सीईओ, एसपीएओ, नोडल ऑफिसर आणि सीपीएमएफ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. आयोगाने राज्याच्या मुख्य सचिवांना पत्र पाठवले आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अधिकाऱ्यांच्या बदल्यांबाबत केलेल्या सूचनांचा अहवाल न दिल्याने नाराजी व्यक्त केली.

## आमदार दळवींच्या पत्नीने केली

# अधिकाऱ्याला मारहाण?

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

अलिबाग येथील आरसीएफ स्कूल बंद करण्यात येऊ नये, यासाठी गुरुवारी पालकांनी शिक्षण विभागासह आरसीएफ प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना घेराव घातला होता. अन्याय, हक्कासाठी व्यवस्थेबरोबर भांडलेच पाहिजे. यावेळी विद्यमान आमदार महेंद्र दळवी यांच्या पत्नी माजी जिल्हा परिषद सदस्या मानसी दळवी जिल्हा परिषदेच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना मारहाण केली. सत्तेच्या जोरावर कोणी कायदा हातात घेत असेल, तर ते निश्चितच निंदनीय आहे. सध्याचे सरकार तुमचे आहे, शिक्षणमंत्रीदेखील तुमचेच आहेत. त्यांच्याकडून शाळा वाचवण्याचे

- **कायदा हातात घेऊन प्रश्न सुटणार नाही**
- **सरकार, शिक्षणमंत्री तुमचेच; तुम्हीच शाळा वाचवा**

प्रयत्न केल्यास विद्यार्थी आणि पालकांसाठी ते दिलादायक ठरेल, अशी चर्चा अलिबागमध्ये आहे.

दरम्यान, तक्रार देणे अथवा न देणे हा संबंधितांचा अधिकार आहे. परंतु, जी प्रवृत्ती फोफावत आहे, त्याला वेळीच लगाम घालणे गरजेचे आहे. अन्यथा अधिकारी, कर्मचाऱ्यांवर अशा पान २ वर

**आमदार महेंद्र दळवी यांच्या पत्नी मानसी दळवी यांनी शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांना मारहाण केल्याचे व्हीडीओमध्ये दिसत आहे. यामध्ये गटशिक्षणाधिकारी पिंगळा, शिक्षण विभागातील अशोक कुकलारे आणि सचिन ओव्हाळ यांचा समावेश आहे. जनतेच्या प्रश्नासाठी आवाज उठवणे आणि त्यांना न्याय मिळवून देणे, हे प्रत्येक लोकप्रतिनिधींचे काम आहे. मात्र, ते करत असताना कायद्याची पायमल्ली होत नाही ना, याचेदेखील भान बाळगणे महत्त्वाचे आहे.**

# सिनेट निवडणुकीत युवासेनेची मुसंडी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबई विद्यापीठाच्या सिनेटवर नोंदणीकृत पदवीधरांमधून दहा जागांपैकी आरक्षण प्रवर्गातील पाच जागावर युवासेनेने बाजी मारली आहे. यानंतर खुल्या प्रवर्गातील मतमोजणीला प्रारंभ होणार आहे. विविध कारणाने तब्बल दोन ते अडीच वर्ष रखडलेली दहा पदवीधर मतदारसंघातील दहा सदस्य

**अभाविपला मोठा धक्का**

निवडीसाठी मंगळवारी मतदान पार पडले. यानंतर विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभ सभागृहात सकाळी ९ वाजता मतमोजणीला सुरुवात झाली.

पहिल्या टप्पयात आरक्षण प्रवर्गातील गटातील मतमोजणी करण्यात आली. यावेळी युवासेनेच्या पाच उमेदवारांनी बाजी मारली आहे. मयुर पांचाळ (ओबीसी), स्नेहा गवळी (महिला प्रवर्ग) शितल शेठ (अनुसुचित जाती), डॉ. धनराज कोहचाडे (अनुसूचित जमाती), शशिकांत झोरे (विज-भज) हे उमेदवार विजयी झाले आहेत. मुंबई विद्यापीठाच्या सिनेट निवडणुकीचा शुक्रवारी (दि. २७) निकाल लागला असून, ठाकरे गटाच्या युवा सेनेने जोरदार मुसंडी मारल्याचे निकालातून स्पष्ट होत आहे.

ही निवडणूक ठाकरे गटाची युवासेना विरुद्ध भाजपा पुरस्कृत अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेमध्ये चुरशीची झाली होती. मुंबई विद्यापीठाच्या फोर्ट संकुलातील सर कावसजी जहांगीर दीक्षान्त सभागृहात मतमोजणी सुरू हाती. यंदा १३ हजार ४०६ मतदारांपैकी जवळपास ५५ टक्के पान २ वर






# परतीच्या पावसाचे थैमान


● (छायाचित्र : राजेश डांगळे)

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**


गेली अनेक दिवस दडी मारलेल्या पावसाने जिल्ह्यात पुन्हा सुरुवात केली आहे. गेल्या चार दिवसांपासून सुरु असलेल्या या परतीच्या पावसाने थैमान घातले आहे. अनेक सखल भागात पाणी साचले असून, शेतांमध्येही पाणी भरू लागले आहे.

जिल्ह्यामध्ये गेल्या चार दिवसांपासून जोरदार पाऊस पडत आहे. रात्री व संध्याकाळच्या वेळेला पाऊस सतत कोसळत आहे. जिल्ह्यातील अलिबाग वगळता अन्य तालुक्यात मोठ्या प्रमाणात पावसाच्या सरी कोसळल्या. शुक्रवारीदेखील सकाळी पाऊस सुरुच होता. दुपारी त्याने काही प्रमाणात विश्रांती घेतली. त्यानंतर सायंकाळी पुन्हा जोर धरला. पावसाचा जोर सतत वाढत राहिल्याने संध्याकाळी घरी जाणाऱ्यांचे प्रचंड हाल झाले. शनिवारी जिल्ह्यात येलो अलर्ट जारी पान २ वर

## काँग्रेसचे नेते रोहिदास पाटील यांचे निधन

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी मंत्री रोहिदास पाटील यांचे दीर्घ आजाराने शुक्रवारी (दि. २७) सकाळी ११ च्या सुमारास निधन झाले. निधनसमयी ते ८४ वर्षांचे होते.



त्यांच्या पार्थिवावर शनिवारी अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात मुलगा धुळ्याचे आमदार कुणाल पाटील, विनय पाटील आणि मुलगी स्मिता पाटील असा परिवार आहे. कोल्हापुरातील हृदयरोग तज्ज्ञ डॉ. चंद्रशेखर पाटील यांचे ते सासरे होत. काँग्रेसचे सच्चे कार्यकर्ते म्हणून पाटलांची ओळख होती.

## गर्दी जमवण्यासाठी प्रशासनाची धडपड

# अंगणवाडी सेविकांना वेठीस

**। पेण । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा 'महिला सशक्तीकरण' हा कार्यक्रम रोहा येथे १ ऑक्टोबर रोजी होणार आहे. त्यासाठी महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी ५०,००० महिला जमविण्याचा संकल्प सोडला आहे. त्यासाठी जिल्ह्यातील अंगणवाडी सेविकांना वेठीस धरायला सुरुवात केली आहे. गुरुवारी पेण येथे तहसील कार्यालयात अंगणवाडी सेविकांची बैठक तहसीलदारांनी लावली होती.

या बैठकीमध्ये प्रत्येक अंगणवाडी सेविकेने लाडकी बहीण योजनेतील सहा लाभार्थींना रोहा येथील कार्यक्रमात आणण्याची सक्ती करण्यात आली आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा तिसरा हप्ता २९ सप्टेंबर रोजी जमा होणार आहे. त्या अनुषंगाने मुख्यमंत्र्यांचा कार्यक्रम २९ तारखेला रोहा येथे ठेवण्यात आला होता. परंतु, ५०,००० महिला जिल्ह्यातून जमविणे शक्य होत नसल्याने हा कार्यक्रम १ ऑक्टोबर रोजी होणार असल्याचे समजते.

**कार्यक्रम दुपारहून आहे. मात्र, अंगणवाडी सेविकांना सकाळी ९ वाजता जमण्यास सांगितले असून, महिलांना नेण्यासाठी खास बसची व्यवस्था केली आहे. तर, गडब येथे फुड पॅकेटचीसुद्धा व्यवस्था केली आहे. एकंदरीत, कार्यक्रमात गर्दी जमा करण्यासाठी अधिकारीदेखील अंगणवाडी सेविकांनाच वेठीस धरत आहेत.**

### कोणावरही सक्ती नाही

**पेण तहसील कार्यालयात अंगणवाडी सेविकांच्या बैठकीसंदर्भात तहसीलदार तानाजी शेजाळ यांना भ्रमणध्वनीवरुन संपर्क करुन विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, अंगणवाडी सेविकांची बैठक आम्ही घेतली होती; परंतु त्यांच्यावर कोणतीच सक्ती केलेली नाही. फक्त आम्ही लाभार्थी महिलांना आवाहन करण्यास सांगितले आहे.**

अंगणवाडी सेविकांना तुटपुंजे मानधन मिळत असल्याच्या विरोधात अंगणवाडी सेविकांच्या प्रतिनिधी आझाद मैदानावर उपोषणाला बसल्या आहेत. त्यांना भेट देण्यास मुख्यमंत्र्यांना व महिला बालविकास मंत्र्यांना वेळ नाही. परंतु, आपल्या कार्यक्रमात गर्दी जमवण्यासाठी याच अंगणवाडी सेविकांना वेठीस धरले जात आहे. ग्रामीण भागात आरोग्यासह इतर सर्व बाबींवर काम, तसेच लाडकी बहीण योजनेची अंमलबजावणीदेखील त्यांनीच केली. असे असताना गर्दी वाढवायलादेखील अंगणवाडी सेविकांना शासन त्रास देत आहे.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२८ सप्टेंबर

१) श्री.प्रदीप कृष्ण पाटील
विद्यानगर-अलिबाग, २८-९-१९४७

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.


**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**महुआ अभिजीत घोडिंदे, अलिबाग**



**कै. श्री. वासुदेव बेत आणि सरस्वती बेत, स्मरणार्थ, अलिबाग**

# उद्याच्या भविष्याची दोरी महिलांच्या हाती

## सामाजिक कार्यकर्त्या वैशाली पाटील यांचे प्रतिपादन

**(पान १ वरुन)**

रायगड ही ऐतिहासिक भूमी आहे. छत्रपती शिवाजी महाराज, माता जिजाऊ यांनी या भूमीत इतिहास घडविला आहे. कुळ कायद्याची चळवळ, आंदोलन, कंपनीविरोधात संघर्ष करणारा असा या जिल्ह्याचा इतिहास आहे. चित्रलेखा पाटील यांच्या रुपाने खंबीर नेतृत्व मिळाले आहे. आता धाडसाने बोलण्याची वेळ आली आहे. जिल्ह्यात ५५ ते ६० टक्के मतदान होते. त्यामध्ये महिला मतदानाचा टक्का अव्वल आहे. त्यामुळे उद्याच्या भविष्याची दोरी आणि चावी महिलांच्या हाती असणार आहे, असे सामाजिक कार्यकर्त्या वैशाली पाटील म्हणाल्या.




पुढे त्या म्हणाल्या, आम्हाला एकदा पंधराशे रुपये देण्यापेक्षा गेल कंपनीत नोकरी द्या. आमच्या मुलांना रोजगाराचे दालन खुले करा. कंपनीला आवश्यक असलेल्या रोजगाराचे प्रशिक्षण घ्या. या भागात पर्यटनवाढीसाठी चालना आहे. महिलांना यातून रोजगार व उत्पन्नवाढीसाठी सरकारने प्रयत्न करणे आवश्यक आहे. घरापासून विकासाच्या निर्णय प्रक्रियेत महिलांना सहभागी करून घ्या. महिला सक्षम होण्यासाठी शेतीबरोबरच मासळी विक्रीच्या उद्योगात महिलांना सक्रीय करून घ्या, तरच त्या सबळ होतील, असेही वैशाली पाटील यांनी सांगितले.

# विरोधकांना तालावर नाचविण्याची वेळ आलीय

## शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे यांचा इशारा

राज्यात २८८ आमदार आहेत. त्यापैकी २४ महिला आमदारांचा समावेश आहे. ही खेदाची बाब आहे. विधानसभेत आमचा विचार कधी करणार, असा सवाल शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे केला. त्या पुढे म्हणाल्या, महिला शक्ती काय आहे, हे आता विरोधकांना कळणार आहे. त्यांना तालावर नाचविण्याची वेळ आली आहे. त्यांना महिला नामोहरम केल्याशिवाय राहणार नाही, अशी टीका ॲड. म्हात्रे यांनी केली.

यावेळी ॲड. म्हात्रे यांनी, मी सुरक्षित आहे, मी स्वयंपूर्ण होणार, मी सक्षम होणार अशी जिद्दी मनाशी बाळगून या मेळाव्यातून




महिलांनी प्रवास करायचा आहे. हा एल्गार बचत गटाचा आहे. महिलांचा आवाज पोहोचू द्या. बहिणीबद्दल सहानुभूती असेल, तर महिलांना प्रतिनिधीत्व द्या, असा टोला सरकारला लगावला.

आज अलिबागसह मुरूड, आक्षी, नागाव या परिसरात पर्यटक मोठ्या प्रमाणात येतात. पर्यटनातून रोजगाराचे साधन खुले करण्याबरोबरच बाजारपेठनिर्मितीची व्यवस्था नाही. त्यासाठी सरकारने प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यासाठी विधिमंडळात लोकप्रतिनिधीच्या रुपाने महिलांचा आवाज जाणे गरजेचे आहे. तरच सर्वसामान्य महिलांचा आवाज सरकारपर्यंत पोहोचेल. महिला स्वावलंबी व सुरक्षित ठेवण्यासाठी महिलांनी एकजूट होणे आवश्यक आहे. बचत गटांचे संघटन वाढवायचे आहे. अप्रवृतीविरोधात चर्चा होणे आवश्यक आहे. महिला, तरुणींना स्वरक्षणाचे धडे मिळाले पाहिजेत, त्या पद्धतीने काम करायला पाहिजे, असेही त्या म्हणाल्या.

# बंदर कामारांना भरघोस पगारवाढ

## देशातील प्रमुख ११ बंदरातील कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

देशातील प्रमुख ११ बंदरांतील गोदी व बंदर कामगारांच्या वेतनामध्ये भरघोस वाढ करणारा वेतन करार शुक्रवारी (दि. २७) संपन्न झाला आहे. हा वेतन करार घडवून आणण्यामध्ये उरण तालुक्यातील भूमीपुत्र कामगार नेते भारतीय मझदूर महासंघाचे महामंत्री सुरेश पाटील यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. यावेळी पाच फेडरेशनचे प्रमुख नेते, पी.एम. मोहम्मद हनीफ, एस.के. शेट्ट्ये, सी.डी. नंदकुमार, नरेंद्र राव, प्रभात सामंतराय, बी. मासेन, इंडियन पोर्ट्स असोसिएशनचे चेअरमन राजीव जलोटा, मॅनेजिंग डायरेक्टर विकास नरवाल, देशातील प्रमुख बंदरांचे अध्यक्ष व उपाध्यक्ष, केंद्रीय श्रम आयुक्त सुनील माळी यांच्या उपस्थितीत वेतन करारावर मुंबई पोर्ट प्राधिकरणाच्या प्रशासकीय कार्यालयामध्ये



सह्या करण्यात आल्या.

या कराराला अंतिम स्वरूप देण्यासाठी नेमलेल्या ड्राफ्टिंग समितीचे व्यवस्थापकीय सदस्य श्रीमती शांती मॅडम व इतर सदस्यांनी मेहनत घेतली. याप्रसंगी भारतीय पोर्ट आणि डॉक मझदूर महासंघाचे अध्यक्ष श्रीकांत राय, खजिनदार सुधीर घरत, गोपी पटनाईक, ज्ञानेश्वर सोनावणे, अनिल चिर्लेकर, दिपक जाधव, जेनपीए विश्वस्त रवींद्र पाटील, मंगेश ठाकूर आदी उपस्थित होते. जेएनपीएसह देशातील प्रमुख ११ बंदरांतील गोदी व बंदर कामगारांच्या वेतनामध्ये भरघोस वाढ झाल्याने जेएनपीए कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# वीस तोळ्यांच्या दागिन्यांची चोरी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील कर्जत नेरळ राज्यमार्ग रस्त्यावरील वडवली गावातील वसंत मोतीराम तळपे यांच्या घरी चोरीची घटना घडली आहे. त्यांच्या घरातील कपाटातील सोन्याच्या दागिन्यांची चोरी झाली आहे. नेरळ पोलीस ठाण्यात वसंत तळपे यांनी २० तोळ्यांचे दागिने चोरीच्या घटनेची नोंद केली आहे.

वसंत मोतिराम तळपे यांच्या पत्नी नम्रता यांनी घराचा दरवाजा उघडून घरत प्रवेश कल्यावर त्यांना घरातील लोखंडी कपाट उघडले असल्याचे दिसून आले. कपाटात ठेवलेले सोन्याचे दागिने लॉकर फोडून लंपास केले असल्याचे आढळून आल्यानंतर वसंत तळपे यांनी नेरळ पोलीस ठाणे गाठून आपल्या घरी चोरी झाली असल्याची तक्रार दिली आहे.

तळपे यांच्या भरलोकवस्तीमध्ये असलेल्या घरात घुसून चोरट्यांनी मोठा ऐवज लंपास केला असून, त्यात गळ्यातील सोन्याची गंठण, गळ्यातील सोन्याचा हार, सोन्याची साखळी, अंगठ्या, बांगड्या, तसेच कण्यातील कर्णफुले असा साधारण १९ ते २० तोळ्यांच्या दागिन्यांचीचोरी केली आहे.

**(पान १ वरुन)**

## महिलांची एकजूट क्रांती घडवेल

श्रीगणेश मंगल कार्यालयातील सभागृहात शुक्रवारी (दि.२७) करण्यात आले. यावेळी चित्रलेखा पाटील बोलत होत्या. यावेळी शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, सामाजिक कार्यकर्त्या वैशाली पाटील, अलिबाग नगरपरिषदेच्या माजी नगरसेविका तथा रायगड जिल्हा महिला बचत गट फेडरेशनच्या उपाध्यक्षा वृषाली ठोसर, संजना कीर, पंचायत समितीच्या माजी सदस्या अश्लेषा नाईक, आक्षीच्या सरपंच रश्मी पाटील, शेकाप कामगार राज्य समितीचे प्रमुख प्रदीप नाईक, शेकाप तालुका चिटणीस अनिल पाटील, सौंदर्या पोईलकर, विद्या मगर, लहानी नाईक, रेखा मगर, पूनम वर्तक आदी मान्यवरांसह महिला बचत गट फेडरेशनचे पदाधिकारी, सभासद, महिला आघाडीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्या व ढवर, सहाण, कावीर, बामणगाव, खानाव, आक्षी, बेली, बेलकडे, रेवदंडा, नागाव, चौलमधील महिला हजारोंच्या संख्येने उपस्थित होत्या. याप्रसंगी चित्रलेखा पाटील म्हणाल्या, आज संवाद मेळाव्याच्या निमित्ताने इतका मोठा जनसागर बघून खऱ्या अर्थाने आनंद वाटला. शेतकरी कामगार पक्षावर प्रेम करणाऱ्या या समूहातून एक वेगळी ऊर्जा मिळाली. डावा व पुरोगामी विचारांचा पक्ष नेहमी महिलांना समान हक्क देणारा आहे. महिलांना पुढे नेणारा पक्ष आहे. महिला सक्षम बनल्या पाहिजे, त्यांना चूल व मूल यापलीकडेही जगता आले पाहिजे. त्या स्वावलंबी झाल्या पाहिजेत, ही भूमिका शेकापचे नेते जयंत पाटील यांची आहे. परंतु, आजही आपल्या समाजात स्त्री-पुरुष समानता दिसून येत नाही. ही मोठी शोकांतिका आहे. महिलांसाठी समाज व्यवस्थेचे वातावरण पोषक नाही, ही मोठी चिंतेची बाब आहे. महिलांमध्ये प्रचंड ताकद आहे. त्या घराबरोबरच देश, राज्य, जिल्हा, तालुका, ग्रामपंचायतीचा कारभार सक्षमपणे चालवू शकतात. माता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सावित्रीबाई फुले या थोर व्यक्तिमत्त्वांचे विचार त्यांच्यापर्यंत पोहोचविण्याची गरज आहे, असेही चित्रलेखा पाटील म्हणाल्या.

शेतकरी कामगार पक्षाने अडचणीच्या काळात मदतीचा हात दिला आहे. कोविडसह अन्य आपत्तीच्या काळात गोरगरीबांसाठी काम करण्याची संधी मिळाली. त्यामध्ये नेत्र तपासणीपासून मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया, मुली शिकल्या पाहिजे या भूमिकेतून काम करताना त्यांच्यासाठी सायकली वाटप केल्या आहेत. सरकारने लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महिलांना दीड हजार रुपये दिले. पण, दुसऱ्या बाजूला सिलिंडरसह अन्य वस्तूंची महागाई गगनाला भिडली आहे. त्याकडे मात्र दुर्लक्ष केले आहे. निवडणुका समोर ठेवून आमिष दाखविण्याचे काम सरकार करीत आहेत. त्यांच्या भूलथापांना बळी पडू नका, असे आवाहन चित्रलेखा पाटील यांनी केले.

राज्यात महिला सुरक्षेचा प्रश्न गंभीर आहे. महिला, तरुणींवर अत्याचार होत असताना त्यांच्याविरोधात कठोर कारवाई होत नाही, ही मोठी चिंतेची बाब आहे. बदलापूर प्रकरणातील आरोपीचे एन्काऊंटर करुन पोलिसांनी एक चांगला निर्णय घेतला. त्यामुळे महाराष्ट्र पोलिसांना खऱ्या अर्थाने सलाम केला जात आहे. महिला, मुलींची छेड काढणाऱ्यांना, त्यांचा जीव घेणाऱ्यांनादेखील अशीच शिक्षा झाली पाहिजे. अत्याचाराच्या घटना घडू नये यासाठी गाव, तालुका पातळीवर महिलांनी एकत्र येऊन काम करण्याची गरज आहे. त्यासाठी महिला आघाडी अधिक मजबूत करण्याचा मानस आहे. महिलांनी ठामपणे उभे राहून या विकृतीविरोधात लढा देणे ही काळाची गरज आहे, असेही त्यांनी सांगितले.

पुढचा काळ हा शेतकरी कामगार पक्षाचा आहे. आगामी काळात येणाऱ्या कंपन्यांनी शेतकऱ्यांना योग्य भाव दिला पाहिजे. स्थानिकांना रोजगार दिला पाहिजे. जिल्ह्यात अनेक कंपन्या आहेत. विशेष म्हणजे, उसर भागात गेल कंपनी आहे. या कंपनीने स्थानिकांना रोजगार मिळवून देण्यासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे. स्थानिकांना रोजगार देण्यासाठी प्रशिक्षण केंद्र खुले केले पाहिजे, ही आपली प्रामुख्याने मागणी आहे.

अलिबाग हे पर्यटनाचे प्रमुख क्षेत्र आहे. आक्षी, नागाव, मुरूड, रेवस, किहीम, मांडवा या भागात मोठ्या प्रमाणात कॉटेज आहेत. या भागात मासेमारी करणारादेखील वर्ग मोठ्या प्रमाणात आहे. पर्यटनातून महिलांना चांगले रोजगार मिळावे यासाठी प्रशिक्षण देण्याचा एक मानस आहे. मच्छिमार महिलांना उभारी देण्यासाठी खंबीरपणे काम करण्याची गरज आहे.

शेकाप हा गोरगरीबांना केंद्रबिंदू ठेवून काम करणारा पक्ष आहे. शेवटच्या घटकाच्या न्याय्य हक्कासाठी काम करणारा पक्ष आहे. त्यामुळे शेकाप कधीही विरोधकांच्या टीकेला घाबरत नाही. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून शेकडो बेरोजगारांना रोजगार मिळणार होते. परंतु विरोधकांनी निवडणुकीचे कारण दाखवून भरतीला स्थगिती आणून बेरोजगारांच्या पोटावर पाय दिला आहे. तरुणांना रोजगार मिळाला पाहिजे, ही आपली भूमिका आहे. त्यासाठी न्यायालयात जाण्याची तयारीदेखील आहे. आपण केलेल्या कामांवर विरोधक कायमच टीका करीत आले आहेत. या टीकांना कधीही भीक घालत नाही. कारण विरोधकांनी मुलींसाठी सायकली वाटप करून दाखवा, गरीबांना घरकुल द्या, नोकऱ्या, रोजगार खुले करून दाखवा, असे आव्हान चित्रलेखा पाटील यांनी विरोधकांना दिले.

## अधिकाऱ्याला मारहाण?

मारहाणीच्या घटना घडतच राहतील. जनतेच्या रोषाला सामोरे जाण्याआधी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी चुकीच्या पद्धतीने कामे केली नाही, तर त्यांच्यावर अशी वेळ येणार नाही. हेदेखील तितकेच खरे आहे.

आरसीएफ कंपनी सुरु झाल्यानंतर तेथील अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या मुलांसाठी कुरुळ वसाहतीमध्ये शाळा सुरु करण्यात आली होती. डेक्कन एज्युकेशन संस्थेने ही जबाबदारी स्वीकारली होती. आरसीएफ कंपनीचे आर्थिक पाठबळ त्यांना मिळत आहे. या शाळेतून बऱ्याच विद्यार्थ्यांचे भविष्य घडले आहे. आरसीएफ कंपनी सुरु होण्यासाठी येथील स्थानिक भूमीपुत्रांनी आपापल्या जमिनी दिल्या आहेत. त्यामुळे त्यांची मुलेदेखील या ठिकाणी शिक्षण घेत आहेत. आरसीएफने हे उत्तरदायित्व शेवटपर्यंत जपलेच पाहिजे.अचानकपणे डेक्कन एज्युकेशन संस्थेने शाळेचा कारभार करता येणार नसल्याचे सांगत हात वर केले आहेत. त्यामुळे शाळा बंद होणार असल्याने पालकांसह विद्यार्थ्यांचा जीव टांगणीला लागला आहे. निम्मे शैक्षणिक वर्ष आता संपत आले असताना, शिक्षण उपसंचालकांनी रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्या अहवालानुसार विद्यार्थ्यांचे समायोजन अन्य शाळेत करण्यास सांगितले आहे, तसेच १० वी आणि १२ वीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी खासगीरित्या फॉर्म १७ भरुन परीक्षेस प्रविष्ठ होण्याची सुविधा उपलब्ध असल्याचे सांगत आपल्यावरील जबाबदारी झटकून टाकण्याचा प्रयत्न झाल्याने पालक संतप्त झाले. जनतेवर अन्याय होत असेल, तर आवाज उठवलाच पाहिजे. त्यामध्ये कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. परंतु, कायदा हातात घेऊन प्रश्न सुटणार नाहीत. ते अधिकच जटील होतील.

गुरुवारी याच विषयासंदर्भात शाळेत बैठक पार पडली. त्यावेळी अधिकाऱ्यांना मारहाण झाल्याचा राडा झाला. विद्यमान आमदार महेंद्र दळवी यांच्या पत्नी मानसी दळवी यांनी शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांना मारहाण केल्याचे व्हीडीओमध्ये दिसत आहे. गटशिक्षणाधिकारी पिंगळा, शिक्षण विभागातील अशोक कुकलारे आणि सचिन ओव्हाळ यांचा समावेश दिसत आहे. जनतेच्या प्रश्नासाठी आवाज उठवणे आणि त्यांना न्याय मिळवून देणे, हे प्रत्येक लोकप्रतिनिधींचे काम आहे. मात्र, ते करत असताना कायद्याची पायमल्ली होत नाही ना, याचेदेखील भान बाळगणे महत्त्वाचे आहे. आपला देश लोकशाहीवर, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानावर चालतो. त्यामुळे प्रत्येकानेच सद्सद्विवेकबुद्धी जागरुक ठेवून वागले पाहिजे, असे म्हटल्यास चुकीचे ठरु नये.

दळवी यांनी मारहाण केल्यावर पिंगळा यांना चांगलाच राग आल्याचेही दिसत आहे. मात्र, विद्यमान आमदारांच्या पत्नी असल्याने ते काहीच करु शकले नाहीत. याविरोधात ते पोलिसात तक्रार करणार आहेत का, अशी विचारणा कुकलारे यांना केली असता, वरिष्ठांशी बोलून निर्णय घेणार असल्याचे सांगितले. तर, पिंगळा यांना संपर्क केला असता त्यांनी फोन उचलला नाही, तर सचिन ओव्हाळ यांनी तक्रार करणार नसल्याचे सांगितले. शिक्षण विभागाने शाळा सुरु ठेवण्याबाबतचा सकारात्मक अहवाल पाठवला आहे. शाळेसंबंधीचा प्रश्न न्यायप्रविष्ठ आहे.दरम्यान, तक्रार देणे अथवा न देणे हा संबंधितांचा अधिकार आहे. परंतु, जी प्रवृत्ती फोफावत आहे, त्याला वेळीच लगाम घालणे गरजेचे आहे. अन्यथा अधिकारी, कर्मचाऱ्यांवर अशा मारहाणीच्या घटना घडतच राहतील.

## परतीच्या पावसाचे थैमान

करण्यात आला आहे. या कालावधीत अनेक भागात मुसळधार पाऊस कोसळण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तविली आहे. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहावे, विनाकारण घराबाहेर पडून नये, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## सिनेट निवडणुकीत युवा सेनेची मुसंडी

मतदारांनी मतदान केले. त्यानुसार ७ हजार २०० मतांपैकी ६ हजार ६८४ मते वैध आणि ५१६ मते अवैध ठरली आहेत. खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना विजयासाठी जवळपास १ हजार ११४ मतांचा कोटा पार करणे आवश्यक आहे. नोंदणीकृत पदवीधर गटाच्या खुल्या प्रवर्गातील ५ जागांसाठी १५, तर प्रत्येकी १ जागा असलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गातून २, अनुसूचित जमाती प्रवर्गातून ३, विमुक्त जाती किंवा भटक्या जमाती प्रवर्गातून ३, इतर मागास वर्ग प्रवर्गासाठी ३, महिला प्रवर्गातून २ असे एकूण २८ उमेदवार १० जागांसाठी निवडणुकीच्या रिंगणात आहेत. राखीव प्रवर्गातून पाचही जागांवर ठाकरे गटाच्या युवा सेनेचे उमेदवार विजयी झाले आहेत. विजयी उमेदवारांची नावे पुढीलप्रमाणे स्नेहा गवळी- महिला राखीव, शीतल देवरुखकर-शेठ - अनुसूचित जाती, धनराज कोहचाडे - अनुसूचित जमाती, शशिकांत झारे - विज-भज, मयूर पांचाळ - इतर मागसवर्ग.

# कलोते ग्रामपंचायतीला महामार्ग पोलिसांची नोटीस

## कचरा महामार्गालगत टाकण्यास सक्त मनाई

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खालापूर तालुक्यातील प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या कलोते ग्रामपंचायत हद्दीतील मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गालगत उघड्यावर कचरा टाकत असल्याने हा कचरा खाण्यासाठी मोकाट गुरांचा वाढलेला वावर अपघाताला निमंत्रण देत आहे. याबाबत महामार्ग पोलीस पळस्पे केंद्राचे पोलीस उपनिरीक्षक वैभव रोंगे यांनी ग्रामपंचायतीला १६ सप्टेंबर रोजी नोटीस बजावली आहे.

कलोते ग्रामपंचायतीची मुंबई-पुणे महामार्गालगत असलेल्या कालव्याला खेटून गावठाण जागा आहे. या जागेत डम्पिंग ग्राऊंड तयार करण्यात आले आहे. ग्रामपंचायत



हद्दीतील हॉटेल, ढाबे, फार्म हाऊस तसेच नागरी वस्तीतील कचरा या ठिकाणी आणून टाकला जातो. कचऱ्याचे कोणत्याही प्रकारचे वर्गीकरण न करता कचरा उघड्यावर टाकण्यात येतो. प्लास्टिक पिशव्या, खराब अन्नपदार्थ, सडलेला भाजीपाला याशिवाय विविध प्रकारचा कचरा जमा होत असल्याने गुरेढोरे, श्वान कचरा खाण्यासाठी गर्दी करतात. डम्पिंग ग्राऊंडला कोणत्याही प्रकारचे संरक्षक भिंत नसल्याने गुरांचा, वावर यामुळे ४ सप्टेंबर रोजी एनएमएमटी बसचा अपघात याठिकाणी घडला होता. तीन गुरांना धडक दिल्यानंतर सुदैवाने बस चालकाने बस नियंत्रित केल्याने प्रवाशांचा जीव वाचला होता.


> **तारेची संरक्षण जाळी लावून याठिकाणी ग्रामपंचायतीच्या वतीने उपाययोजना राबविण्यात येणार आहे, तरी ग्रामस्थांनी सहकार्य करत या ठिकाणी कचरा टाकू नये.**
> **– निलेश म्हसकर, ग्रामसेवक, कलोते**

या घटनेनंतर कलोते ग्रामपंचायतीने कचरा विल्हेवाट योग्य रितीने लावण्यासाठी महामार्ग पोलीस पळस्पे यांनी नोटीस बजावली आहे. कचरा विल्हेवाटीसाठी योग्य उपाययोजना करण्याचे सूचना दिल्या आहेत.

## रामचंद्र पडवळ यांचे निधन

**। रसायनी । वार्ताहर ।**

बारवई येथील हभप रामचंद्र बाळू पडवळ यांचे नुकतेच निधन झाले. निधनसमयी ते ९७ वर्षांचे होते. भजन, कीर्तन, सप्ताहात त्यांचा सहभाग असायचा.



त्यांचा दशक्रिया विधी बुधवार, दि. २ ऑक्टोबर रोजी श्रीक्षेत्र उध्दर रामेश्वर येथे, तर, उत्तरकार्य शनिवार, दि. ५ ऑक्टोबर रोजी बारवई येथील राहत्या घरी होणार आहेत.

**पनवेल महानगरपालिका, पनवेल**

ई-निविदा सूचना क्र : पमपा/उद्यान/२२२२/ प्र.क्र.१४/४०८/२०२४ | दिनांक : २७/०९/२०२४

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा क्र. | दिलेल्या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू. | इसारा रक्कम रुपये | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग (ड) मधील उद्यानांमध्ये लॉन लावणे व ३ वर्षाकरीता देखभाल करणे. | PMC / Garden/06 /2024-25 | रु.१,०८,८४,३३०/- (GST विरहित) | १,०८,८४३/- | ३६ महिने |

या कामाच्या ई-निविदेबाबतची माहिती शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २७/०९/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
**(डॉ.प्रशांत रसाळ)**
**अतिरिक्त आयुक्त - I,**
**पनवेल महानगरपालिका, पनवेल**

**ग्रुप ग्रामपंचायत कडापे, ता. माणगांव, जि. रायगड**

**निविदा सुचना**

ग्रुप ग्रामपंचायत कडापे यांजकडुन खालील कामाकरिता जास्तीत जास्त नोंदणी कृत ठेकेदारकडून अल्प मुदतीची निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकिय रक्कम | काम पूर्ण करावयाचा कालावधी | योजनेचे नाव | निविदा सादर करणेची अंतिम तारीख | वेळ | ठिकाण | कोरे निविदा फॉर्म फि | १%इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | आरोग्य विषयक माहिती शिबिर घेणे | ६९६५० | ६ महीने | १५ वा वित्त आयोग | ०८/१०/२०२४ | १०.०० | ग्रा. पं. कडापे | १००/- | ६९६/- |
| २ | कौशल्य विकास प्रशिक्षण | ५३५८७ | ६ महीने | १५ वा वित्त आयोग | ०८/१०/२०२४ | १०.०० | ग्रा. पं. कडापे | १००/- | ५३५/- |
| ३ | जंतुनाशक फवारणी करणे | ९१९३८ | ६ महीने | १५ वा वित्त आयोग | ०८/१०/२०२४ | १०.०० | ग्रा. पं. कडापे | १००/- | ९१९/- |
| ४ | कडापेवाडी आदिवासीवाडी येथे पाण्याची टाकी दुरुस्ती करणे | ९१९३८/- | ६ महीने | १५ वा वित्त आयोग | ०८/१०/२०२४ | १०.०० | ग्रा. पं. कडापे | १००/- | ९१९/- |
| ५ | मागासवर्गीय वस्तीत समाज मंदीरा मध्ये भौतिक सोई सुविधा पुरविणे | ११०३३६/- | ६ महीने | १५ वा वित्त आयोग | ०८/१०/२०२४ | १०.०० | ग्रा. पं. कडापे | १००/- | ११०३/- |
| ६ | सार्वजनिक कचरा कुंड्या खरेदी करणे | ८९१५२/- | ६ महीने | १५ वा वित्त आयोग | ०८/१०/२०२४ | १०.०० | ग्रा. पं. कडापे | १००/- | ८९१/- |
| ७ | कडापेवाडी बोरवेलवर सोलर पंप बसविणे (अपूर्ण काम) | ८९१५२/- | ६ महीने | १५ वा वित्त आयोग | ०८/१०/२०२४ | १०.०० | ग्रा. पं. कडापे | १००/- | ८९१/- |
| ८ | कांदळगांव बु. स्मशान शेड बांधणे | १०६९९२/ | ६ महीने | १५ वा वित्त आयोग | ०८/१०/२०२४ | १०.०० | ग्रा. पं. कडापे | १००/- | १०६९/- |
| ९ | बांदलवाडी फाटा ते बांदलवाडी गाव रस्ता करणे. | ७००००० / | ६ महीने | जलसुविधा योजना | ०८/१०/२०२४ | १०.०० | ग्रा. पं. कडापे | १००/- | ७०००/- |
| १० | पाणीपुरवठा कलोरीनिकरण करणे | ५००००/- | ६ महीने | १५ वा वित्त आयोग | ०८/१०/२०२४ | १०.०० | ग्रा. पं. कडापे | १००/- | ५००/- |

**अटी व शर्ती**

१. कामाचे अंदाजपत्रक व आराखडे कार्यालयीन वेळेत पाहावयास मिळतील आवश्यक असलेस फि भरून त्याची प्रत उपलब्ध केली जाईल.
२. अंतिम तारखेस दि. ०८/१०/२०२४ रोजी स.१०.०० वा नंतर निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.
३. प्राप्त निविदा दि. ०८/१०/२०२४ रोजी स.११.३० वा ग्रामपंचायत कार्यालयात उपस्थितांचा समक्ष मा. सरपंच यांच्या हस्ते उघडण्यात येतील.
४. कोणतेही एक अथवा अनेक निविदा कोणते ही कारण न देता रद्द करणेचा अधिकार मा.सरपंच यांना राखून ठेवला आहे.
५. प्रत्येक देयकातून आयकर व उपकराची कपात केली जाईल तसेच सुरक्षा अनामत व शासन नियमाप्रमाणे इतर रक्कम कपात केली जाईल.
६. पंचायत समितीचे तांत्रिक अधिकारी व ग्रामपंचायतीचे सदस्य यांचे मार्गदर्शनाखाली व देखरेखी खाली काम करणेच असून काम समाधानकारक नसेल तर त्याच स्थिल थांबवून कार्यारंभ आदेश रद्द करणेचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवलेला आहे.

सही/-
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत कडापे**
**मु.कडापे, ता.माणगांव, जि.रायगड**

सही/-
**ग्रामसेवक**
**ग्रुप ग्रामपंचायत कडापे**
**मु.कडापे, ता.माणगांव जि.रायगड**

# वांगणी पाषाणे पूल धोकादायक

## नवीन पूल उद्घाटनाच्या प्रतीक्षेत

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

पाषाणे वांगणी येथील उल्हास नदीवर एक जुना पुल आहे. या पुलावर भगदाड पडले असून तो अत्यंत नाजूक स्थितीत आहे. तरी देखील या जुन्या पुलावरून वाहतूक सुरूच आहे. दरम्यान, या ठिकाणी नवीन पुल बांधण्यात आला आहे. परंतु, पुलाच्या ठेकेदाराचा हलगर्जीपणा व काही राजकारण्यांनी पुलाचे उद्घाटन न झाल्यामुळे हा नवीन पुल बंद करून ठेवला आहे. यामुळे जुन्या पुलावरून धोका पत्करून वाहतूक करावी लागत आहे.

ठाणे आणि रायगड या दोन जिल्ह्याला जोडणाऱ्या वांगणी पाषाणे येथील उल्हास नदीवर एक जूना पूल आहे. त्याच्याच बाजूला नवीन पुलाची बांधणी करण्यात आली असून या पुलाच्या दोन्ही बाजूकडील रस्त्याचा भराव जुलै महिन्यातल्या मुसळधार पावसामध्ये खचला होता. उद्घाटनापूर्वीच या पुलावरून वाहतूक सुरू झाल्याने मोठी दुर्घटना होण्याची शक्यता निर्माण झाली होती. यामुळे ठेकेदाराने पुलाच्या दोन्ही बाजूकडील रस्त्यावर खडी आणि कच्चामाल टाकून पुलावरील वाहतूक पुर्णपणे बंद केली होती. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तक्रार केल्यानंतर बांधकाम विभागाने पुलाच्या ठेकेदाराला या कामाबाबत असलेल्या त्रुटी सुधारण्यासाठी नोटीस दिली होती. मात्र, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या या नोटिसीला ठेकेदाराने केराची टोपली दाखवली आहे. या पुलाच्या कामांमध्ये असलेल्या त्रुटी सुधारण्यासाठी कोणतेही काम केले गेले नाही. सध्या या पुलावरून छोट्या वाहनांची वाहतूक सुरू झाली आहे.

नविन पुलाच्या दोन्ही बाजूकडील रस्ता खचलेला असताना ठेकेदाराकडून आणि सार्वजनीक बांधकाम विभागाकडून कोणतीही सुधारणा करण्यात आलेली नाही. असे असताना नवीन पुलावरील वाहतूक देखील जीवघेणे ठरू शकते. तरी देखील ठेकेदाराचे याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत आहे. तसेच, राजकारणी मंडळींना या नविन बांधलेल्या पुलाचा उद्घाटन सोहळा करायचा असल्यामुळे पुलावरून अधिकृतपणे वाहतूक सुरू केली नाही. परिणामी जुन्या पुलावरून धोकादायक प्रवास करावा लागत आहे. या खचलेल्या रस्त्यामुळे कोणताही अपघात होऊ नये यासाठी ठेकेदाराला पाठीशी न घालता सार्वजनिक बांधकाम विभागाने गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे असल्याचे बोलले जाते.



# जयंत पाटील यांची सांत्वनपर भेट

## उरण- केगावमधील म्हात्रे कुटुंबियांची केली विचारपूस

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते प्रमोद महादेव म्हात्रे यांचे शनिवारी (दि. २१) अल्पशा आजारामुळे निधन झाले. या निधनाची माहिती मिळताच शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी गुरुवारी (दि.२६) रोजी उरण येथील केगाव येथे जाऊन म्हात्रे कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेऊन त्यांची विचारपूस केली.

यावेळी शेकाप उरण तालुका चिटणीस विकास नाईक, उरण विधानसभा मतदार संघ अध्यक्ष रमाकांत पाटील, शेकापचे ज्येष्ठ नेते काका पाटील, पंचायत समितीच्या माजी सदस्या माया पाटील, रायगड जिल्हा मजूर फेडरेशनचे संचालक भारतराज थळी, शेकाप शहर चिटणीस शेखर पाटील, उरणच्या शेकाप तालुका महिला आघाडी प्रमुख सिमा घरत, उरण विधानसभा मतदार संघ युवक अध्यक्ष मयूर सुतार, माजी सभापती ॲड. सागर कडू, माजी उपसभापती महादेव बंडा, ज्येष्ठ कार्यकर्ते मनोहर पाटील, दिलीप पाटील, जीवन पाटील, नैना पाटील, अनंत घरत, रवि घरत, वामन तांडेल आदी पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच दिवंगत प्रमोद म्हात्रे यांचे कुटूंबिय उपस्थित होते. प्रमोद म्हात्रे हे शेकापचे निष्ठावंत कार्यकर्ते होते. त्यांच्या निधनाने कुटूंबात दुःखाचे सावट कोसळले असून त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी, मुले, भाऊ असा परिवार आहे.

# परतीच्या पावसाने शेतकरी हवालदिल

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

सध्या रात्रंदिवस कोसळणाऱ्या परतीच्या पावसाने चांगला जोर पकडला असून, त्याचा परिणाम खरीप हंगामाला बसत असून भात, नाचणी, आणि वरी ही पिके धोक्यात आली आहेत. यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे.



भारत देश हा कृषीप्रधान देश आहे. आपल्या देशातील शेती ही मोसमी पावसावर अवलंबून आहे. यामुळे कधी ओला दुष्काळ तर कधी सुका दुष्काळ तर कधी शेतीवर येणारी नैसर्गिक संकटे यामुळे शेती ही बेभरवशाची झाली आहे. यातच शेतीशी संबंधित घटकांचे वाढते दर पाहता शेती करावी की नाही, या कचाट्यात शेतकरी वर्ग सापडला आहे. चिरनेर भागात ठाकूर, कातकरी आदिवासी बांधव मोठ्या प्रमाणावर नाचणी व वरीची पीके घेत असतात. सध्या बऱ्याच ठिकाणच्या खलाटीत व रानमाळात भात, नाचणी, आणि वरीची पिके फुलोरा धरण्याच्या अवस्थेत आहेत. तर, काही भातपिके दाणे भरण्याच्या अवस्थेत असून काही भातपिके कापणीसाठी तयार झाली आहेत. मात्र, सतत कोसळणाऱ्या पावसामुळे भात शेतीवरील फुलोरा गळून पडण्याची व भाताचे दाणेही पोचट राहण्याची भीती येथील शेतकऱ्याला आहे.

दरवर्षी परतीच्या पावसाचा तडाखा शेतीला बसत असल्याने शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान होते, असे शेतकरी दत्तात्रेय म्हात्रे यांनी सांगितले. परतीच्या पावसाचा असाच धुमाकूळ राहिला, तर तयार भातशेती भुईसपाट होईल.

# अलिबागेत हातमाग, यंत्रमाग कापडाचे प्रदर्शन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

सोलापूर येथील भाऊराया हॅण्डलूम यांचे हातमाग व यंत्रमाग कापडाचे भव्य प्रदर्शन व विक्री अलिबाग येथील सार्वजनिक वाचनालय डोंगरे हॉल येथे सुरू आहे. हे प्रदर्शन १२ ऑक्टोबरपर्यंत चालणार आहे. या प्रदर्शनातील हातमाग, विणकाम करून तयार केलेले कापड अत्यंत चांगल्या दर्जाचे असल्यामुळे अलिबागकरांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन हातमाग कापड प्रदर्शनाचे प्रमुख पांडुरंग पोतन यांनी केले आहे. ते पुढे म्हणाले की, भारतीय संस्कृतीच्या प्रसारासाठी व हातमागाच्या विणकाम करून वापरण्या योग्य कापड तयार केले जाते. या कापडाच्या वापरामुळे कोणत्याही प्रकारचा त्वचा रोग होत नाही. मात्र, हे कापड तयार करण्यासाठी मनुष्यबळ अधिक लागत असल्याने सद्या विक्री दरापेक्षा उत्पादन खर्च जास्त असल्याचे पांडुरंग पोतन यांनी म्हटले आहे.

या प्रदर्शनामध्ये विविध प्रकारच्या हातमाग व यंत्रमागवर उत्पादित वस्त्रे जसे कॉटन साडी, इरकल साडी, मधुराई साडी, खादी साडी, धारवाड साडी, मधूराई सिल्क साडी, सेमी पैठणी, खादी सिल्क साडी, प्रिंटेड ड्रेस, वर्क ड्रेस मटेरियल, पटोला ड्रेस, कॉटन परकर, टॉप पिस, सोलापूर चादर, बेडशीट, नॅपकिन, सतरंजी, पंचा, टॉवेल, वुलनचादर, दिवाणसेट, प्रिंटेड बेडशीट, पिलो कव्हर, लुंगी व शर्ट, कुर्ता, बंडी, गाहून, विविध प्रकारच्या विक्रीसाठी ठेवण्यात आले आहे. तसेच, सुती व खादी कापडाच्या विक्रीवर २०% टक्के सुट ठेवण्यात आली आहे. हे प्रदर्शन सकाळी १० ते सायंकाळी ९ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# डेब्रीज टाकणाऱ्यांवर सिडकोची कारवाई

**। पनवेल । वार्ताहर ।**

सिडकोने संपादित केलेल्या जमिनीवर आणि भूखंडावर मानवी आरोग्यास धोकादायक तसेच पर्यावरणास हानिकारक असलेले डेब्रीज टाकणाऱ्या डंपर चालकांची सिडकोकडून धरपकड सुरुच आहे. सिडकोच्या पथकाने गव्हाण-जासई रोड एमटीएचएल लेबर कॅम्प लगतच्या जागेमध्ये डेब्रीज टाकण्यासाठी आलेले ५ डंपर पकडले आहेत. तसेच, त्यावरील डंपर चालकांविरोधात गुन्हा दाखल करुन त्यांना ताब्यात घेतले आहे. सिडकोच्या भूखंडावर अनधिकृतपणे मोठ्या प्रमाणात डेब्रीज टाकण्यात येत असून हे डेब्रीज मानवी आरोग्यास धोकादायक आणि पर्यावर्णास हानिकारक असल्याचे आढळून आले आहे. डेब्रीजला आळा घालण्याच्या दृष्टीने अभियांत्रिकी विभाग आणि पोलीस पथकाकडून धरपकड करण्यात येत आहे.

# शेतकरी कामगार पक्षामध्ये इन्कमिंग सुरूच

## आ.महेश बालदींच्या समर्थकांचा जाहीर प्रवेश

**। पनवेल । प्रतिनिधी ।**


महाराष्ट्रात लवकरच विधानसभा निवडणुकीचे पडघम सुरू होणार असून रायगड मधील उरण विधानसभा सध्या सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. या ठिकाणी होणारी लढत ही अत्यंत चुरशीची होणार असल्याचे बोलले जात आहे. यातच शेकापचे रायगड जिल्हा खजिनदार प्रितम जनार्दन म्हात्रे संपूर्ण ताकदीने गेल्या पंधरा वर्षाच्या राजकीय कारकीर्दीत केलेल्या सामाजिक, अध्यात्मिक, शैक्षणिक, रोजगार निर्माण अशा अनेक कार्याच्या जोरावर महाविकास आघाडीच्या माध्यमातून पुन्हा विधानसभा खेचून आणण्यासाठी संपूर्ण उरण विधानसभा पिंजून काढत आहेत. यामुळे आपला गड राखण्याचे आवाहन आ. महेश बालदी यांच्यासमोर राहणार आहे.



धुतुम येथील आ. महेश बालदी यांचे अत्यंत जवळचे आणि भाजपचे अध्यक्ष रोशन ठाकूर यांनी त्यांचे वडील रामशेठ ठाकूर यांच्यासोबत संपूर्ण कुटुंबीय आणि मित्र-परिवारासोबत शुक्रवारी (दि.२७) प्रितम म्हात्रे यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून मा. आ. बाळाराम पाटील आणि पनवेलचे मा. नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे यांच्या उपस्थितीत शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. यावेळी बोलताना शेकाप नेते ज्ञानेश्वर मोरे यांनी सांगितले की, प्रत्येक वेळी पक्ष प्रवेश करताना सगळेजण स्वतः साठी काही मागणी ठेवतात आणि प्रवेश करतात. यावेळी सुद्धा ठाकूर कुटुंबीयांनी महेश बालदी यांना आमदार या पदावरून पायउतार करण्याची मोठी मागणी केली आहे. यासाठी आम्ही दिवस-रात्र एक करू आणि भरघोस मतांनी प्रितम म्हात्रे यांना निवडून आणू असे आश्वासनही दिले आहे.

यावेळी पं.स. माजी सभापती काशिनाथ पाटील, कृउबा सभापती नारायण घरत, उरण विधानसभा चिटणीस जितेंद्र म्हात्रे, ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील, पनवेल जिल्हा चिटणीस गणेश कडू, विभागीय चिटणीस विलास फडके, चिटणीस राजेश केणी उपस्थित होते.

> “उरण विधानसभेत यावेळी मविआच्या माध्यमातून लाल बावटा फडकवण्यासाठी शेकाप कार्यकर्ता संपूर्ण ताकतीने काम करत आहे. आजपर्यंत विविध क्षेत्रात पक्षाच्या आणि वैयक्तिक जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या माध्यमातून समाज उपयोगी काम केली आहेत. महिला सुरक्षा आणि सक्षमीकरण यासाठी कामे केलेली आहेत, ती लोकांपर्यंत आमचे कार्यकर्ते पोहचवत आहेत. उरण आणि खालापूर परिसरातील बेरोजगारीचा प्रश्न खूप मोठा आहे, यावर काम करणे गरजेचे आहे. विकासाच्या दृष्टीने आमच्यावर विश्वास ठेवून रोशन ठाकूर यांच्यासारखे तरुण शेकापक्षात येत आहेत. यामुळे आमची ताकद नक्कीच वाढेल.
>
> – प्रितम म्हात्रे, जिल्हा खजिनदार, शेतकरी कामगार पक्ष,रायगड.”



● मुरुडला वादळी पाऊस येणार असल्याचा अंदाज होता. सायंकाळच्या वेळी समुद्रकिनारी काळे ढग दाटुन आले होते, याचबरोबर मनमोहक अशा रंगछटा देखील दिसल्या. समुद्रकिनारी पर्यटक नसल्यामुळे घोडेवाले स्वतः अशा वातावरणात रपेटचा आनंद लुटत होते. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

# मुख्यमंत्री वयोश्री योजनेस उत्तम प्रतिसाद

**माथेरान :** राज्य सरकारच्या माध्यमातून मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना कार्यान्वित होत असताना ज्येष्ठ नागरिकांनासुद्धा राज्य सरकारच्या माध्यमातून मुख्यमंत्री वयोश्री योजनेला सुरुवात करण्यात आलीआहे. याला ज्येष्ठांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे. माथेरानमध्ये या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या योजनेत ६५ वर्षांवरील ज्येष्ठांना एकदाच ३ हजार रुपयांची आर्थिक मदत शासनाकडून मिळणार आहे. या योजनेतून पात्र वृद्ध लाभार्थ्यांना त्यांच्या शारीरिक दुर्बलतेनुसार उपकरणे खरेदी करता येतील. या योजनेचा लाभ घेण्यासाठी जवळपास ५० लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रे जमा करून उत्तम प्रतिसाद दिलेला आहे.

# वेनगावच्या आदिवासी महिला आक्रमक

**। वेनगाव । वार्ताहर ।**

कर्जत तालुक्यातील वेनगाव ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत येथील आदिवासी वाडीतील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, दारूचे धंदे व विजेच्या प्रश्नांवरून आदिवासी महिला आक्रमक झाल्या होत्या. १५ ऑगस्ट रोजी घेण्यात आलेली ग्रामसभा कोरम अभावी तहकूब करण्यात आली होती. हीच सभा बुधवारी (दि.२५) घेण्यात आली.



आदिवासी वाडीत गेले काही दिवसांपासून पुरेसे पाणी मिळत नाही. यामुळे पाणी बाहेरून आणावे लागते. आदिवासी वाडी ही उंच भागावर असल्याने नळाचे पाणी सरळ खाली उतरट भागाकडे निघून जात असल्यामुळे येथील महिलांना पाणी मिळत नाही. तसेच, काही ठिकाणी पथदिव्यांवर लाईट नाही. गावात दारूचे अवैध धंदे सुरू असून ही दारू पिऊन अनेक तरुण व्यसनाच्याहारी गेले आहेत. या दारूपायी तरुण मुले व माणसे मरण पावल्याने कित्येक महिला विधवा झाल्या आहेत. त्यामुळे गावात एकही दारूचा धंदा न ठेवता सर्व धंदे बंद करा, असा पवित्रा घेऊन उपस्थित आदिवासी महिला ग्रामसभेत आक्रमक झाल्या होत्या. यावर गावात सरसकट दारू बंदी करण्यात येईल, असे सरपंच व उपस्थित सदस्यांकडून सांगण्यात आले.

ग्रामसभेत सरपंच अश्विनी पालकर, सदस्य अभिषेक गायकर, तंटामुक्त अध्यक्ष सचिन शेलार, शोभा दाभाडे, वसंत जाधव, अनंता गायकवाड, मंगेश पालकर, निखिल क्षिरसागर, निलेश कुडेकर, प्रसाद मिरकुटे, संगीता वाघमारे, नवशी वाघमारे, कुसुम हीलम, गुलाब पवार, शकुन वाघमारे, तारी नीलम आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

## शेतकरी वर्गाचे प्रचंड नुकसान; उपाययोजना करण्याची गरज

# मानवनिर्मित कचरा प्राण्यांच्या जिवावर

**। कोलाड । वार्ताहर ।**

**मानवाच्या हलगर्जीपणामुळे तसेच पर्यावरणाबाबत असलेल्या प्रचंड उदासिनतेमुळे दिवसेंदिवस पर्यावरणाचे संतुलन प्रचंड प्रमाणात बिघडत चालले आहे. याचा परिणाम प्राण्यांवर होत असून या कचऱ्यावर उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे.**



भारत देश हा कृषी प्रधान देश असल्यामुळे बहुतेक लोकांचा व्यवसाय शेती हा आहे. तर, शेतीला पूरक व्यवसाय म्हणून पशुधन आणि दुग्ध उत्पादन असा व्यवसाय ते करीत आहेत. परंतु, वाढते शहरीकरण व वाढत्या लोकसंख्येचा बेजबाबदार प्रवृत्तीचा फटका शेतकरी वर्गाला बसत आहे. शेतीला पूरक असणाऱ्या पशुधनावर देखील याचा विपरीत परिणाम होत आहे. आपल्या निष्काळजीपणामुळे पर्यावरणातील ठिकठिकाणी साठवलेल्या घाणीच्या साम्राज्यावरील प्लॅस्टिक गुरेढोरांच्या जिवावर उठत आहे. वातावरणातील प्लॅस्टिक इतर खाद्याबरोबर पोटात गेल्याने गुरेढोरे किंवा इतर प्रणिमात्रांना भयंकर त्रास सहन करावा लागत आहे. तसेच, प्लॅस्टिक पिशव्या खाल्ल्याने पचनक्रियेसह रवंथ क्रियेवर देखील परिणाम होऊ लागला आहे. यामुळे शेतकरी वर्गाचे प्रचंड नुकसान होत आहे. देशात प्लॅस्टिक पिशव्यांच्या वापरावर बंदी असुन देखील त्यांचा बेसुमार वापर केला जात आहे. बाजारात जातांना कापडी पिशवी नेण्यास कमीपणा वाटतो. तर, बाजारासाठी दुकानदारांकडून पुरविल्या जाणाऱ्या प्लॅस्टिक पिशव्यांना सर्वत्र ठिकाणी प्राधान्य दिले जात आहे. या प्लॅस्टिकच्या पिशव्यांचे काम झाल्यावर त्या पिशव्या कुठेही फेकून दिल्या जातात. यामुळे आपल्या सभोवती प्लॅस्टिक पिशव्यांच्या कचऱ्याचे साम्राज्य वाढत चालले आहे. कचऱ्यामुळे प्राणीमात्रांना होणाऱ्या त्रासासोबतच आजूबाजूला रोगराई देखील पसरत आहे. यामुळे खड्डे खोदून अशा कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची मागणी शेतकरी वर्गातून केली जात आहे.

# अलिबागेत हास्यकाव्य संमेलन

**। अलिबाग । वार्ताहर ।**

कोकण मराठी साहित्य परिषदेच्या अलिबाग शाखेची मासिक सभा अनंत देवघरकर यांच्या निवासस्थानी ९ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आली होती. या सभेचे अध्यक्षस्थान शाखेच्या अध्यक्षा सुजाता प्रसाद पाटील यांनी स्वीकारले होते.



श्रुती राजे देसाई यांच्या स्वलिखित महाराष्ट्र गीताच्या विडंबन काव्याने हास्य काव्यसंमेलनाला सुरुवात झाली. देवघरकर यांनी ‘उपासतापास टाइमपास’ ही स्वलिखित कविता, डॉ. चंद्रकांत वाजे यांनी विविध साहित्यिकांच्या जीवनातील विनोद, वर्षा कुवळेकर यांनी ‘उदासबोध’ या काव्यसंग्रहातील कविता, तर पूर्वा लाटकर यांनी वऱ्हाडी स्टाईल विनोद कविता सादर केल्या. नंदू तळकर यांनी जयवंत दळवींच्या ‘सारे प्रवासी घडीचे’ या विनोदी व्यक्तीचे रेखा वाचन केले. मीनल तवटे यांच्या कवितेने हास्याचे फवारे उडविले.

सचिन बार्वेकर यांनी ‘चकली’ कविता, निर्मला फुलगावकर यांनी त्यांची स्वरचित ‘जमाना बदल गया’ कविता, अल्केश जाधव यांनी ‘तू हात काप, मी गळा कापीन’ ही कविता सादर करून संमेलनात मज्जा आणली. सुजाता पाटील यांच्या ‘निवडणूक’ या कवितेने रंगत भरली. श्रुती राजे देसाई यांनी ‘रिस्क’ कविता तर दीपाली नेटके यांनी रत्नपारखी या कवींची ‘शेपटा’ कविता सादर केली. विलास नाईक यांनी त्यांच्या ‘एक ना धड’ या पुस्तकातील विनोदी कथेचे वाचन केले. रमेश धनावडे यांच्या ‘अंतर’ कवितेने संमेलनातील हास्याचा उच्चांक गाठला. तर, त्यांनी गायलेल्या त्यांच्या ‘बाय माझी लाराची’ या आगरी गाण्याने सर्व उपस्थित साहित्यिकांना डोलायला लावले.

# ही मिजासही उतरेल

राज्यात भाजपच्या बैठकांचे सत्र जोरात सुरू आहे. हाही प्रचाराचाच एक भाग असतो. आमचे कसे शिस्तीत चालू आहे हे दाखवायचा हा प्रयत्न असतो. अमित शाह दरवेळी त्यासाठी दिल्लीतून येतात. तसे ते दोन दिवस येऊन गेले. कार्यकर्त्यांचे मेळावे झाले. लोकसभेला असेच मेळावे झाले तेव्हा चारशे पारचा जोर होता. आता निवडणूक आपल्या खिशातच आहे असा माहोल होता. शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांनी एक तरी जागा जिंकून दाखवावी असे उद्दाम आव्हान भाजपचे संकटमोचक गिरीश महाजन यांनी दिले होते. आशिष शेलार यांनी तर आपण राजकारणातून निवृत्त होऊ असा इशारा दिला होता. ही मस्ती मतदारांनी उतरवली होती. तेव्हा नरेंद्र मोदी हे एकटेच निवडणूक जिंकायला पुरेसे आहेत असे वाटत होते. आता मोदींचे गुणगान गायब झाले आहे. २०१४ च्या यशानंतर केंद्रात नरेंद्र आणि महाराष्ट्रात देवेंद्र अशी घोषणा करण्यात आली होती. आता ती मागे पडली आहे. नागपूरच्या बैठकीत सामुदायिक नेतृत्व हेच पक्षाला तारेल असा साक्षात्कार शाह यांना झाला. फडणवीस, बावनकुळे आणि नितीन गडकरी यांच्या नेतृत्वात लढायचे आहे असा आदेश कार्यकर्त्यांना देण्यात आला. तसे अधिकृत पत्रक कार्यकर्त्यांना वाटण्यात आले. गंमत म्हणजे हे तिन्ही नेते विदर्भाचे आहेत. विदर्भात विधानसभेच्या एकूण ६२ जागा आहेत. पूर्वी इथून काँग्रेसला एकगठ्ठा जागा मिळत. २०१४ मध्ये भाजपने ४४ जिंकून तोच चमत्कार केला. पण २०१९ मध्ये तो आकडा २९ वर आला आणि सत्ता गेली. त्यामुळे विदर्भावर कबजा करण्यासाठी पक्षाने कंबर कसली आहे. पण ते सोपे नाही. लोकसभेला दहापैकी सात जागा महाविकास आघाडीला मिळाल्या आहेत. काँग्रेसला परत येथे सूर सापडला आहे. कदाचित त्यासाठीच विदर्भाच्या तीन नेत्यांना पुढे करण्यात आले असावे. पण गोष्टी हातातून सुटल्या आहेत.

### संघ संधीच्या शोधात

गंमत अशी की नागपुरातील बैठकीला गडकरी हजरच नव्हते. ते काश्मिरात प्रचाराला गेले होते. मध्यंतरी, राज्यातील निवडणुकीची सर्वच जबाबदारी गडकरींकडे द्यावी असा बूट निघाला होता. पण राज्यातील तीन पायांच्या शर्यतीचे कप्तान व्हायला खुद्द गडकरींनीच नकार दिला म्हणतात. चुकूनमाकून विजय मिळालाच तर मोदींपेक्षा गडकरी वरचढ होऊन बसतील ही भीती होतीच. त्यामुळे आता सामुदायिक नेतृत्वाची आयडिया काढण्यात आली आहे. मोदी नावाचे नाणे बाराच्या भावात गेले असल्याची ही कबुली म्हणायला हवी. यामध्ये देवेंद्रांचीही एका परीने सुटका आहे. कारण, निवडणुकीत पराभव झाला तर त्यांचा बळीचा बकरा झाला असता. आता सामुदायिक म्हटल्यावर सगळ्यांची जबाबदारी, आणि कोणीच दोषी नाही असे म्हणता येईल. महाराष्ट्राच्या निवडणुकीत संघाने बराच रस घेतला आहे. कारण, इथे मार पडला तर घरघर लागायला सुरूवात होईल हे संघाला दिसते आहे. ऐन लोकसभेच्या प्रचारात भाजपचे अध्यक्ष जेपी नड्डा यांनी पक्षाला आता संघाची गरज उरली नसल्याचे म्हटले होते. हे विधान मोठे रहस्यमय होते. त्याचा खुलासा आजतागायत ना भाजपने केला ना संघाने त्यावर कधी नाराजी व्यक्त केली. उलट हे विधान करणाऱ्या नड्डा यांचे पक्षाध्यक्षपद कायम ठेवून त्यांना केंद्रीय मंत्रिमंडळात घेण्यात आले. नड्डा यांचे वक्तव्य मोदींच्या इशाऱ्यावरूनच केले गेले होते व मोदी-शाह यांची गुर्मी अजूनही कायम आहे, असा त्याचा अर्थ होता. मध्यंतरी मोहन भागवत यांनी मोदींना आडून आडून कानपिचक्या दिल्या. आपण म्हणजे देव झालो असे कोणी मानू नये असे ते म्हणाले. लोकसभेपूर्वी गप्प झालेले गडकरी पुन्हा बोलू लागले आहेत. सत्ताधीशांना विरोधकांचे ऐकून घेण्याची सवय असली पाहिजे असे ते परवा म्हणाले. हा सरळच मोदींना टोला आहे. सारांश, संघ किंवा गडकरी हे संधीची वाट पाहत आहेत. योग्य वेळ येताच मोदी-शाह यांच्या पायात बेड्या पडतील.

### फोडाफोडीची हौस

लोकसभेसाठी बाहेरून आयात फार जोरात होती. पण ती बहुतेक सर्व वाया गेली. अजितदादा हे तर काट्यासारखे सलताहेत. कालच देवेंद्रांची खदखद पुन्हा बाहेर आली. दादांच्या राष्ट्रवादीची आम्हाला अपेक्षित तितकी मते लोकसभेला मिळाली नाहीत असे ते म्हणाले. एकीकडे तिघेही एकत्र राहणार असण्याच्या आणाभाका घ्यायच्या आणि दुसरीकडे भाजपमधून रोज कोणी ना कोणी अजितदादांवर टीका करायची हे अनेक दिवसांपासून चालू आहे. दादांना महायुतीबाहेर काढण्याचा हा खटाटोप आहे असे अनेकांना वाटते. दादा गेले तर जास्तीच्या जागा लढवायला मिळतील असा त्यातला हिशेब असावा. पण आपल्यावरच उलटू शकतो इतकेही भान भाजपला उरलेले नाही. आयातांमुळे फटका खावा लागूनही फोडाफोडीची हौस मात्र भागलेली नाही. अमित शाह यांनी कार्यकर्त्यांना संदेशच दिला की, महाविकास आघाडीचे बूथ पातळीवरचे कार्यकर्ते फोडा. आतापर्यंत भाजपची प्रत्येक मतदारसंघात पन्नाप्रमुखांची कशी मोठी फौज आहे त्याचे कौतुक मिडियावाले करीत असत. ते सगळे वायफळच होते असा याचा अर्थ. संघाचा गावोगावचा विस्तार यादेखील निव्वळ बाता आहेत हे यावरून दिसते. त्याहूनही महत्वाचे म्हणजे, नेते गेले तरी खालचे कार्यकर्ते पक्ष सोडून जात नाहीत याचीही ही एक प्रकारे कबुलीच म्हणायला हवी. जरांगे यांनी भाजपचा माज उतरवण्याचा पण केला आहे. मराठवाडा, सोलापूर आणि उत्तर महाराष्ट्रात ते दणका देणार. तरीही परवा शाह कार्यकर्त्यांना म्हणाले की, गुजरातेतील पटेल आंदोलनाप्रमाणे आम्ही मराठ्यांनाही गुंडाळू. हे ऐकून देवेंद्रांनीही कपाळाला हात लावला असेल. याच शाह यांनी एकनाथ शिंदे यांना पैलवान म्हणून उभे केले व ते भाजपच्या डोक्यावर मिऱ्या वाटत आहेत. एकूण सुंभ जळला तरी मोदी आणि शाह यांचा पीळ कायम आहे. भाजपवाले अशाच गमजा करीत राहिले तर तो या विधानसभेला पुरता जळेल यात शंका नाही. या चाणक्यांची मिजास महाराष्ट्रच उतरवेल.

---

विचार

# हॅरिस की ट्रम्प?

*अमेरिकेच्या अध्यक्षपदाची निवडणूक धोकादायक बनत आहे. अलिकडे पुन्हा एकवार करण्यात आलेल्या हल्ल्यातून डोनाल्ड ट्रम्प बचावले असले तरी देशातील धोकादायक वातावरण उघड झाले आहे. दुसरीकडे अध्यक्षीय वादविवादानंतर मजबूत नेत्या म्हणून कमला हॅरिस यांची प्रतिमा उदयास आली आहे. अशा परिस्थितीत अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत कोण बाजी मारणार, याची उत्कंठता वाढली आहे.*



**अजय तिवारी**

अमेरिकेच्या अध्यक्षपदाची निवडणूक नेहमीच अनागोंदीने भरलेली असते. यंदाची निवडणूक तर आणखी गोंधळाची बनली आहे. रिपब्लिकन आणि डेमोक्रॅट्सने अमेरिकेची विभागणी केल्यामुळे पाच नोव्हेंबर रोजी होणारी म हत्त्वपूर्ण निवडणूक आता 'स्विंग स्टेट्स'वर अवलंबून आहे. त्यामुळे ही निवडणूक जास्त चुरशीची होण्याची शक्यता आहे. आता अशी शक्यता आहे की 'स्विंग स्टेट्स' जिंकेल तो देशाचा पुढचा अध्यक्ष होईल; परंतु ट्रम्प यांचा एकूण स्वभाव लक्षात घेता आणि कमला हॅरिस यांना मतदारांचा मिळत असलेला प्रतिसाद पाहता ते पराभव सहन करू शकतील का? या राज्यांमध्येच ट्रम्प यांची टीम निवडणूक लढवण्याची आणि हॅरिस यांचा विजय अवैध ठरवण्याची तयारी करत असल्याची भीती वाढत आहे. त्याचे अनेक पुरावे सापडले आहेत. रिपब्लिकन वापरत असलेल्या अनेक घाणेरड्या युक्त्यांपैकी ही एक आहे. मंगळवारच्या चर्चेपूर्वी ट्रम्प यांनी हॅरिस यांच्या विरोधात प्रभावी हल्ला करण्याचा प्रयत्न केला. विद्यमान अध्यक्ष ज्यो बायडेन यांनी शर्यतीतून माघार घेतल्यानंतर हॅरिस यांनी लोकशाही मोहिमेला चैतन्य दिले. त्या लोकांच्या नजरेत राहण्याचा आटोकाट प्रयत्न करत असताना ट्रम्प यांनी त्यांच्यावर भयंकर वैयक्तिक हल्ले सुरू केले आणि धोरणावर लक्ष केंद्रित करण्याच्या त्यांच्या सहाय्यकांच्या सल्ल्याकडे दुर्लक्ष केले. ही चूक त्यांनी गेल्या वेळीही केली होती. वादविवादाच्या वेळी ट्रम्प यांनी हॅरिस यांच्यावर वैयक्तिक हल्ले केले, तर हॅरिस यांनी ट्रम्प यांच्या कमकुवतपणावर हल्ला केला. त्यामुळे ट्रम्प अनेक वेळा विचलित झाले. ट्रम्प हे त्यांच्या विरोधकांबद्दल वैयक्तिक टिप्पण्या करण्यासाठी अनेक वर्षांपासून ओळखले जातात. त्यांच्या अनेक समर्थकांच्या मते हॅरिस यांच्यावरील हल्ल्यामध्ये त्यांनी अनेक मर्यादा ओलांडल्या आहेत.

अध्यक्षपदाच्या शर्यतीमध्ये ट्रम्प आता वंशवादावर उतरले आहेत. हॅरिस कृष्णवर्णीय आणि दक्षिण आशियाई आहे, अलीकडेच ती 'काळी व्यक्ती' बनली आहे.' अशी टीका त्यांनी केली आहे. अध्यक्षपदाच्या निवडणुकीत मर्यादाभंग करताना ट्रम्प यांनी कृष्णवर्णीय पत्रकारांच्या परिषदेत म्हटले की, हॅरिस काळ्या आहेत, हे मला माहीत नव्हते आणि आता ती कृष्णवर्णीय म्हणून ओळखली जात आहे. ती भारतीय वर्णाची आहे. त्यांच्या या टिप्पण्या आक्षेपार्ह आहेत. त्यांची टीका तमाम भारतीयांना नाराज करणारी आहे, हे वेगळे सांगायला नको. ट्रम्प निवडणूक जिंकण्यासाठी वांशिक टिप्पण्यांचा आधार घेत आहेत, यावरून त्यांच्या पायाखालची वाळू सरकली आहे, असा होतो. देशाचे पहिले कृष्णवर्णीय अध्यक्ष बराक ओबामा यांचा जन्म अमेरिकेत झाला नसल्याचा खोटा आरोप करण्याचा ट्रम्प यांचा वर्णद्वेषाचा मोठा आणि घृणास्पद इतिहास आहे. आता ते हॅरिस यांच्यावरही अशीच टिप्पणी करत आहे.

ट्रम्प यांनी आठ वर्षांपूर्वीच्या निवडणुकीत अध्यक्षपदाच्या तत्कालीन उमेदवार हिलरी क्लिंटन यांच्यावरही बेफाम आरोप केले होते. चुकीच्या लैंगिकतावादी आरोपांच्या मागील रेकॉर्डची पुनरावृत्ती करून ट्रम्प यांनी तेच विधान पुन्हा पोस्ट केले. प्रतिस्पर्ध्यावर चुकीचे हल्ले करण्याची गेल्या दहा दिवसांमधली त्यांची ही दुसरी वेळ. ती अशोभनीय आणि निषेधार्ह आहे. अमेरिकनांना वांशिक टिप्पणी आणि लैंगिक हल्ले आवडत नाहीत. हॅरिस यांच्यावर वांशिक आणि लैंगिक हल्ला करणारे ट्रम्प एकटे नाहीत. त्यांनी डेमोक्रॅटिक पक्षाची उमेदवारी मिळवल्यानंतर काही वेळातच इंटरनेटवर त्यांच्याबद्दलच्या चुकीच्या आणि लैंगिकतावादी कथांचा एक ऑनलाइन स्फोट झाला. त्यापैकी बरेच खोटे होते, हे सिद्ध झाले आहे. काही 'सोशल मीडिया' पोस्टमध्ये हॅरिस यांचे सॅन फ्रान्सिस्कोचे माजी महापौर विली ब्राउन यांच्याशी संबंध होते, असे म्हटले गेले. हा आरोप अनेक पुराणमतवादी प्रभावकर्त्यांनी पुन्हा जागृत केला. त्यांनी हॅरिस यांचा एक मॉर्फ केलेला फोटो इन्स्टाग्राम वर पोस्ट केला. त्यात त्यांना बदनाम फायनान्सर आणि दोषी लैंगिक गुन्हेगार जेफ्री एपस्टाईनसोबत दाखवण्यात आले. बहुतेक चुकीच्या माहितीमध्ये लैंगिक ट्रोल्सच नाही, तर खोट्या ट्रान्सफोबिक लेखांचाही समावेश आहे. २०२० मध्ये अमेरिकन सनलाइट प्रोजेक्टच्या सह-संस्थापक, डिसइन्फॉर्मेशन वॉचडॉग, नीना जॅन्कोविझ यांनी केलेल्या एका अभ्यासात नमूद केले आहे की निवडणुकीदरम्यान १३ महिला राजकारण्यांवर हल्ले करणारी 'लिंगभेद आणि विकृत माहिती'ची तीन लाख ३६ हजारांहून अधिक प्रकरणे नोंदवली गेली. यापैकी सुमारे ७८ टक्के प्रकरणे हॅरिस यांच्यासंबंधी आहेत.

मागील निवडणुकीत ट्रम्प यांनी निवडणूक निकाल स्वीकारण्यास नकार दिला होता आणि त्यांच्या चिथावणीनंतरच समर्थकांनी अमेरिकन संसदेवर हल्ला केला. या वेळीही चर्चेदरम्यान ट्रम्प यांनी कॅपिटल हिलवरील हल्ल्याचा बचाव केला. ट्रम्प यांनी पुन्हा एकदा पुराव्याशिवाय ठामपणे सांगितले की गैरप्रकार करून निवडणूक जिंकण्यात आली. कॅपिटलवर हल्ला करणाऱ्या हिंसक जमावाचा त्यांनी बचाव केला. ट्रम्प यांनी स्प्रिंगफील्ड, ओहायो येथे हैतीयन स्थलांतरितांवर पाळीव प्राणी मारल्याचा आणि खाल्ल्याचा घृणास्पद आरोप केला. याबाबत पुरावा मागितला असता 'मी ते टेलिव्हिजनवर पाहिले' असे बेजबाबदार उत्तर ट्रम्प यांनी दिले. टीव्हीवरील ताज्या वादामध्ये एक म जबूत नेता म्हणून हॅरिस यांची प्रतिमा उदयाला आली आहे, तर ट्रम्प पूर्णपणे नकारात्मक आणि उदास दिसत होते. त्यामुळे संपूर्ण रिपब्लिकन पक्षात नाराजी आणि उदासीनता आहे. वादविवादानंतर घेतलेल्या मतचाचण्यांमध्ये ट्रम्प लक्षणीयरीत्या मागे पडू लागले आहे. त्यामुळे रिपब्लिकन आणि डेमोक्रॅटिक पक्षाचा प्रभाव असणाऱ्या राज्यांमध्ये फेरविभागणी झाली आहे. प्रमुख स्विंग राज्यांमधील किरकोळ फरकावर निवडणुकीचे निकाल अवलंबून राहणे अपेक्षित आहे. हॅरिस यांचा संभाव्य विजय कमकुवत करण्याच्या प्रयत्नात ट्रम्प यांची टीम निकालांना आव्हान देऊ शकते, अशी चिंता वाढत आहे.

अध्यक्षपदाची निवडणूक जवळ येत असताना हॅरिस यांच्याविरोधात खोटे बोलण्यासाठी ट्रम्प यांची टीम तयार आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि इलॉन मस्कचे ट्विटर यामध्ये खूप महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. मस्क हे ट्रम्प यांची पूजा करत आहेत. ट्रम्प आणि त्यांचे समर्थक हॅरिस यांच्याकडून पराभव सहन करू शकतील का, हीच सर्वात मोठी शंका आहे. बेलगाम बंदुका असलेल्या अमेरिकेत आजघडीला ध्रुवीकरण शिगेला पोहोचले आहे, ते गृहयुद्धाला कारणीभूत ठरू शकते, यात शंका नाही. अमेरिकेत पाच नोव्हेंबरला होणाऱ्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीपूर्वी ताज्या सर्वेक्षणाचे निकाल समोर आले आहेत. सर्वेक्षणानुसार, ट्रम्प आणि हॅरिस यांच्यात कोण कोणाला आणि किती प्रमाणात मागे टाकत आहे हे जाणून घेणे खूप मनोरंजक आहे. सर्वेक्षणामध्ये हॅरिस यांना ४७ टक्के तर ट्रम्प यांना ४२ टक्के मतदारांचा पाठिंबा असल्याचे दिसते. नोंदणीकृत म तदारांमध्ये केलेल्या या दोनदिवसीय सर्वेक्षणात हॅरिस यांना पाच टक्के गुणांची आघाडी मिळत असल्याचे दिसते. अध्यक्षीय वादविवाद ऐकणाऱ्यांपैकी ५३ टक्के लोकांनी हॅरिस जिंकतील असे म्हटले तर २४ टक्के लोकांनी ट्रम्प जिंकतील, असे म्हटले आहे.

५९ वर्षीय हॅरिस यांनी ७८ वर्षीय ट्रम्प यांना अध्यक्षपदाच्या लढाईपुर्वी झालेल्या वादात बचावात्मक पावित्र्यात ढकलले आहे. डेमोक्रॅट आणि रिपब्लिकन यांच्याकडून आलेल्या प्रतिक्रियांनुसार वारे कोणत्या दिशेने वहात आहे, हे ही स्पष्ट झाले आहे. ५३ टक्के रिपब्लिकनांनी ट्रम्प यांनी सरशी वर्तवली आहे, तर ९१ टक्के डेमोक्रॅट्सनी हॅरिस यांच्या विजयाची शक्यता व्यक्त केली. अमेरिकेतील अध्यक्षपदाच्या निवडणुकीमध्ये अशा काही गोष्टी घडत आहेत, ज्याचा आधुनिक काळात विचारही केला जात नव्हता. निवडणुका जवळ येत आहेत, तसतसे प्रचारातील विष वाढत आहे.

ट्रम्प यांच्यावर दुसऱ्यांदा हल्ला करण्याचा प्रयत्न झाला आहे. ट्रम्प यांचा प्रचार आणि त्यांचे भाषण याला मोठ्या प्रमाणात जबाबदार आहे. त्यांनी अमेरिकन समाजाला मित्र आणि शत्रूमध्ये विभागले आहे. आपल्या सोबत असणारा अमेरिकेचा मित्र आहे तर विरोधात असणारा अमेरिकेचा शत्रू आहे, असे ट्रम्प यांनी म्हटले आहे. यापूर्वी अमेरिकन निवडणुकांमध्ये असा विचार कधीच पहायला मिळाला नव्हता.

---

आजकाल

# अदानीवर आणखी एक खैरात

**कॉ. राजन क्षीरसागर**

भारतातील कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी केंद्र सरकारच्या पुढाकाराने व नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालया मार्फत कृषी सिंचन आणि विकास वाढवण्यासाठी शेतकऱ्यांना सौर ऊर्जेवर चालणारे कृषी पंप उपलब्ध करून देण्यासाठी - योजना कार्यान्वित करण्यात आली. मराठवाड्यातील हाजारो शेतकऱ्यांनी दिवसा विना व्यत्यय विज मिळण्याच्या आशेने मोठ्या प्रमाणावर नोंदणी करून सहभाग घेतला. आवश्यक प्रक्रिया पूर्ण केलेल्या पात्र शेतकऱ्यांनी रु १६ हजार ते ४४ हजार रुपये पर्यंत १०% वाटा देखील योजनेसाठी भरले. परंतु आजपर्यंत म्हणजे तीन वर्षांनंतरही योजनेची अंमलबजावणी करण्यात आली नाही. केंद्र सरकार, महाराष्ट्र सरकार व महाउर्जा (MEDA) पिएम-कुसुम योजना पुर्ण करण्यात अपयशी ठरली. यामुळे दुष्काळग्रस्त मराठवाड्यातील हजारो शेतकरी सिंचनापासुन वंचित राहिले आहेत.

PM-KUSUM योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना आवश्यक सेवा व मदत देण्याऐवजी ठराविक कॉर्पोरेट कंपन्यांना सुमारे १.५ लाख कोटी रुपयांची मक्तेदारी धंदा उपलब्ध करून देण्यासाठी केंद्रातील मोदी सरकार योजना राबविण्यात आहे का....? नेहमीप्रमाणे या योजनेत देखील शेतकऱ्यांच्या नावे कार्पोरेट कंपन्यांना खैरात वाटली जात आहे. २०१५ पासून अदानी कार्पोरेशन हे सौर उर्जेची उत्पादने निर्मिती व्यवसायात सक्रिय झाले आणि त्याच वेळी केंद्र सरकार पीएम-किसान योजना घोषित करते हा केवळ योगायोग नसावा! आणि विशिष्ट नियमाने अदानीच्या कंपनीला जास्तीत जास्त लाभ होईल अशी या योजनेची रचना करण्यात आली आहे. यातूनच अदानी २०२७ पर्यंत १० GW पर्यंत जगातील प्रमुख उत्पादक बनतील. या व्यवसायात गुंतलेल्या कंपन्यांना भरघोस फायदा होईल. बाजार भावापेक्षा किमती वाढवणे, करार शुल्क, सुरक्षा ठेव शुल्क, भरमसाठ GST बोजा विविध प्रकारचे शुल्कांचा भार शेतकऱ्यांच्या खिशावर लादण्यात आलेला आहे. वाढीव खर्च व सेवातील अडथळे असुनही दिवसा वीज मिळण्याच्या आशेने मोठ्या संख्येने पात्र शेतकरी २०२१ पासून सौर ऊर्जा पंप बसवण्यासाठी प्रतिक्षेत बसले आहेत.

महाउर्जा या नोडल एजन्सीच्या अनागोंदी आणि भ्रष्ट कार्यपद्धती यातून कंपन्यांनी आपले उखळ जरूर पांढरे करून घेतले. या योजनेअंतर्गत नऊ महिन्यांत सौर ऊर्जा पंप देण्याची जबाबदारी मार्गदर्शक सुचनेत निश्चित करण्यात आली असताना योजनेच्या लाभापासून तीन ते चार वर्षापासून दहा टक्के योगदान भरणारे शेतकरी वंचित ठेवले आहेत. ज्या शेतकऱ्यांना सौर पंप मिळाले आहेत. त्यांना पाच वर्षीय देखभाल व दुरुस्ती सेवा देण्याचा करार शर्तीत करण्यात आला असताना दुरुस्ती संदर्भात नोडल एजन्सी कडून कोणत्याही सेवा देण्यात कंपन्या कडून टाळाटाळ केली जात आहे. स्थानिक बाजारपेठेत कोणतेही सुटे भाग उपलब्ध नसल्याने अनेक शेतकऱ्यांचे सौर पंप नादुरुस्त अवस्थेतच बंद पडले आहेत. सेवा देणाऱ्या कंपन्याकडून कडून शेतकऱ्यांच्या कोणत्याही तक्रारीला प्रतिसाद दिला जात नाही. अंमलबजावणीतील त्रुटीबाबत व लाभधारकांना सेवा उपलब्ध करून देण्याबाबत किंवा करात भंग केल्या बाबत सरकारच्या वतीने कारवाई केली जात नाही. या सर्वच अनुचित प्रकार बाबत किसान सभेच्या वतीने योजनेच्या अंमलबजावणीत शेतकरी विरोधी कार्यप्रणालीच्या विरोधात व मराठवाडा विभागातील सौर पंप संघापासून वंचित हजारो पात्र शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत दि. ३० सप्टेंबर २०२४ पासून महाउर्जा (MEDA) च्या छ. संभाजी नगर (औरंगाबाद) कार्यालया समोर बेमुदत धरणे आंदोलन पुकारले आहे. यातील मागण्या खालील प्रमाणे आहेत. १) २०२१ पासून प्रलंबित पीएम कुसुम योजना लाभार्थ्यांचे सौर शेतीपंपसेट तत्काळ बसवा. २) देखभाल व दुरुस्ती अभावी नादुरुस्त सौर शेतीपंपसेट तक्रारींचे निराकरण व दुरुस्ती ७२ तासात करा. ३) मुदतीत सौर शेतीपंपसेट बसवले नाहीत अशा सर्व शेतकऱ्यांना प्रतिवर्ष ५० हजार रुपये नुकसान भरपाई द्या. ४) नैसर्गिक आपत्ती मध्ये नुकसानग्रस्त सौर शेतीपंपसेटची नुकसान भरपाई समाविष्ट करण्यासाठी केंद्र सरकारच्या एन डी आर एफ मार्गदर्शक सूचीमध्ये आवश्यक तरतूदी करा. ५) तुटफुट, नैसर्गिक आपत्ती, चोरी प्रकरणी सौर पंपासाठी महाउर्जा च्या माध्यमातून विमा संरक्षण अदा करा. ६) योजनेसाठी निधीची तरतूद वाढवून किंमती कमी करा. ७) सुरक्षित ठेव/अनामत रक्कम, प्रोसेसिंग फिस, ॲग्रीमेंट फी, सर्विस कनेक्शन चार्ज, इत्यादी प्रकारची वसुली पीएम कुसुम योजना शेतकऱ्याकडून वसुली बंद करा. आजवर केलेल्या या वसुली परत करा. ८) याच योजनेतून शेतकऱ्याकडून भरमसाठ गुड्स आणि सर्व्हिस कर वसुली रद्द करा. ९) लाभार्थ्यांच्या तांत्रिक तक्रार निवारणासाठी सार्वजनिक स्तरावर देखरेख व मूल्यमापन समिती गठीत करा.

**- राष्ट्रीय अध्यक्ष किसान सभा**

---

लोकसंसद

## उघड्या मॅनहोलचे अजून किती नाहक बळी?

परतीच्या पावसाने मुंबईला यथेच्छ झोडपून काढल्यानंतर नेहमीप्रमाणेच शहरातील गल्लीबोळातील सखल भागात पाणी साचले. नद्यांचे स्वरुप आलेले रस्ते दुथडी भरून वाहू लागले. अशातच अंधेरी पूर्वेला असलेल्या सीप्झ जवळील रस्त्यात साचलेल्या पाण्यातून मार्ग काढताना उघड्या मॅनहोलमध्ये पडून विमल गायकवाड नावाच्या एका ४५ वर्षीय महिलेचा नाहक मृत्यू झाला. याआधी ऑगस्ट २०१७ मध्ये झालेल्या अतिवृष्टीत मुंबईतील सुप्रसिद्ध पोटविकार तज्ज्ञ डॉ. दीपक अमरापूरकर यांचा मॅनहोलमध्ये पडून मृत्यू झाला होता. त्यानंतर २०१८ आणि २०१९ या दोन पावसाळ्यात पुन्हा चेंबूर आणि धारावीमध्ये २ आणि ७ वर्षांच्या मुलांचा उघड्या मॅनहोलमध्ये पडून मृत्यू झाला. महापालिकेच्या एकूणच गलथान, अकार्यक्षम व बेजबाबदार कारभारामुळे निष्पाप नागरिकांचे बळी जाणे ही खरे तर नेहमीचीच आणि सामान्य बाब झाली आहे. करदात्या नागरिकांच्या नशिबी हाती मात्र महापालिका प्रशासनाला दोष न देता 'आपुले मरण पाहिले म्या डोळा' म्हणत उघड्या मॅनहोलमधून स्वतःचा जीव वाचविणे आले आहे.

**- प्रदीप शंकर मोरे,** अंधेरी

---

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२८ सप्टेंबर**

**१८९३ :-** पाच दशकाहून अधिक काळ काव्यलेखन करणारे रविकिरण मंडळातील एक कवी शं.के. कानेटकर तथा कवी गिरीश यांचा जन्म. 'काव्यरत्नावली, मनोरंजन, चित्रमयजगत' आदी नियतकालिकांतून त्यांच्या कविता प्रसिध्द. 'बालगीत' हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह. त्यानंतर 'वीणा झंकार', 'यशोगिरी', 'कांचनगंगा', 'फलभार', 'चंद्रलेखा', 'कांचनमेघ', 'सोनेरी चांदणे' आदी संग्रह प्रसिध्द. याशिवाय 'अभागी कमल', 'कला', 'आंबराई', 'अनिकेत' ही दीर्घ व खंडकाव्येही त्यांनी लिहिली. तसेच काव्यकला, 'मराठी नाट्यछटा' ही पुस्तके कवी माधव ज्युलियन यांचे चरित्र आणि काही संपादीत साहित्यही त्यांच्या नावावर आहे. **१८९८ :-** लेखक, पत्रकार, स्वातंत्र्यसेनानी मामा दाते यांचा जन्म. 'भाभानगर सत्याग्रह', हिंदुस्थान इतिहास, हिंदुधर्म स्वरुप, भारतीय समाजकार, मुद्रण स्वरुप ही पुस्तके प्रकाशित. **१८९८ :-** वृत्तपत्रीय लेखक, ग्रंथकार काशिनाथ त्र्यंबक खरे यांचे निधन. सुधारक, ज्ञानप्रकाशमधून त्यांचे लेख प्रसिध्द. 'स्थानिक स्वराज्य', 'हिंदुस्थानातील शेतकऱ्यांची स्थिती व शेतकीची कामे', 'वक्तृत्वकला विवेचन', 'हिंदू आणि मुसलमानांत होणारे तंटे व ते बंद करण्याविषयी विनंती' आदी पुस्तके त्यांनी लिहिले. **१९०९ :-** लेखक, शास्त्रज्ञ, रबरावर विशेष अभ्यास या अभ्यासाला धरुनच 'रबर भाग १,२', 'रबर - नैसर्गिक व संश्लेषित' ही रबराची शास्त्रशुध्द माहिती देणारी पुस्तके त्यांनी लिहिली आहेत. **१९२४ :** लेखक, बालसाहित्यिक प्रभाकर दिगंबर देशपांडे यांचा जन्म. 'आवडत्या गोष्टी' हा कुमारकथासंग्रह 'उध्दार' ही नाटिका आणि 'माधवी' हा कथासंग्रह अशी साहित्य संपदा. **१९४३ :** कवी दादा मडकईकर यांचा जन्म. ह्यांनी मालवणी व मराठीतून काव्यलेखन केले आहे. ह्यांचे 'कोकण हिरवे गार' आणि 'आबोलेचो वळसार' आदी काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. **१९२४ :** - लेखक, बालसाहित्यिक प्रभाकर दिगंबर देशपांडे यांचा जन्म. 'आवडत्या गोष्टी' हा कुमारकथासंग्रह 'उध्दार' ही नाटिका आणि 'माधवी' हा कथासंग्रह अशी साहित्य संपदा. **१९४३ :-** कवी दादा मडकईकर यांचा जन्म. ह्यांनी मालवणी व मराठीतून काव्यलेखन केले आहे. ह्यांचे 'कोकण हिरवे गार' आणि 'आबोलेचो वळसार' आदी काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. **१९४९:-** लेखिका अंजना उदय कर्णिक यांचा जन्म. त्यांच्या साहित्य संपदेत 'भावतरंग' हा काव्यसंग्रह. 'प्रकाशवाट' व 'ज्याचा त्याचा संघर्ष' हे कथासंग्रह आणि 'आनंदबोळ' हा बालकाव्यसंग्रह त्यांच्या नावावर आहे. याशिवाय 'तेजोशलाका'तून कर्तृत्ववान स्त्रियांचे दर्शन तसेच 'मराठी असे आमुची मायबोली' या स्टेज शो चे लेख व सादरीकरणासह एकपात्री कार्यक्रम त्या करतात. **१९४९:-** लेखक सदानंद बकाराम मोहतुरे यांचा जन्म. ह्यांचा 'भंडारा जिल्हा' हा माहितीपर ग्रंथ प्रकाशित झाला आहे. **१९५७ :-** कवी नितीन रमेश तेंडुलकर यांचा जन्म. 'पावसाळा' हा काव्यसंग्रह त्यांच्या नावावर आहे. **१९६८ :-** चरित्रकार, वाङ्मयविवेचक बाळकृष्ण गणेश खापर्डे यांचे निधन. 'उदय' या साप्ताहिकाचे संस्थापक. आपल्या वडिलांचे म्हणजे दादासाहेब खापर्डे यांचे चरित्र तसेच साहित्यातील, प्रेरणा, पध्दती आणि ध्येय व ध्यानयोग इ. पुस्तके त्यांनी लिहिली. **१९७६ :-** रंगभूमिविषयक ग्रंथाचे लेखक पुरुषोत्तम श्रीपाद काळे यांचे निधन. ललितकलेच्या सहवासात आणि रंगभूमीवरील नेपथ्य ही त्यांची पुस्तके प्रसिध्द.प्रेरणा, पध्दती आणि ध्येय व ध्यानयोग इ.पुस्तके त्यांनी लिहिली. **१९७६ :-** रंगभूमिविषयक ग्रंथाचे लेखक पुरुषोत्तम श्रीपाद काळे यांचे निधन. ललितकलेच्या सहवासात आणि रंगभूमीवरील नेपथ्य ही त्यांची पुस्तके प्रसिध्द. **१९८३ :-** लेखक, कवी अर्जुन विष्णू जाधव यांचा जन्म. 'जागर' या सामाजिक काव्यसंग्रहासह 'बेळगाव कुणाच्या बापाचं', 'माझा बाप', 'उध्वस्त गिरणी कामगार', 'बागलकोटची सुगंधा', 'प्रेयसी एक आठवण' इ. पुस्तके प्रसिध्द याशिवाय वृत्तपत्रे, मासिक, दिवाळी अंकातून समाज प्रबोधन लेखन. १९८६ : - लेखक धनंजय नाफडे यांचे निधन. त्यांचा 'कॅलव्हास आणि झाडीपट्टीची रंगभूमी' हे संदर्भग्रंथ प्रकाशित झाले आहेत. **२००३ :-** वैद्यक, पत्रकार आरोग्यशिक्षण व आरोग्यविषयक स्तंभलेखक डॉ. सुरेश दत्ताराम नाडकर्णी योगदान. यांचे निधन. मराठीत वैद्यकशास्त्रावरील ग्रंथांची सूची तयार करण्यात त्यांचे महत्त्वपूर्ण **२००३ :-** शाहीर बाबासाहेब देशमुख यांचे निधन. त्यांचे पोवाडे महाराष्ट्रभर गाजले.

**- संजय वझरेकर**
९७५५७६६७५

# पुरस्कार नामावलीच्या फलकाचे अनावरण

**। अलिबाग । वार्ताहर ।**
**रायगड जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालय व डॉ. एस.आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक ग्रंथमित्र पुरस्कार नामावलीच्या फलकाचे पुरस्कार प्राप्त ग्रंथालये व कार्यकर्ता/सेवक यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले.**



याप्रसंगी उपस्थित पुरस्कारार्थींनी या स्तुत्य निर्णयाबद्दल ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर व ग्रंथालय संचालनालयाचे सर्व अधिकारी यांचे आभार मानून रायगड जिल्ह्याचे प्रभारी जिल्हा ग्रंथालय अधिकारी अजित पवार यांनी नामफलकाच्या अनावरणाचा मान सेवक व कार्यकर्ता यांना दिल्याबद्दल आनंद व समाधान व्यक्त केले.

याप्रसंगी पुरस्कार प्राप्त ग्रंथालय सेवक व कार्यकर्ता यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष संजय बोंदार्डे, उपाध्यक्ष शैला पाटील, द.श. सावंत, संघाचे माजी अध्यक्ष व संचालक नागेश कुळकर्णी, कोकण विभागाचे प्रमुख कार्यवाह प्रकाश पाटील, कार्याध्यक्ष रामदास गायकवाड, संघाचे कोषाध्यक्ष भालचंद्र वर्तक, सहकार्यवाह अभिजीत चौधरी, कोकण विभागाचे माजी अध्यक्ष विद्यमान संचालक मनोज गोगटे, माजी प्रमुख कार्यवाह जीजा घरत, संचालक सुमेधा शिंदे, मराठे मॅडम आणि रायगड जिल्ह्यातील पदाधिकारी आणि ग्रंथालय सेवक उपस्थित होते.

शेवटी शासनाने ई-ग्रंथालय संगणक अज्ञावली विकसित केली आहे, त्याचे अ तालुका ग्रंथालयांना सादरीकरण जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयातील ग्रंथालय अधिकारी अजित पवार आणि लिपिक सौ. रोगे यांनी प्रात्यक्षिक करून दाखवले. शवेटी भक्ती वर्तक यांचरूा आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## केळंबा देवीच्या नवरात्रोत्सवाच्या तयारीला वेग



**। खरोशी । वार्ताहर ।**
दरवर्षीप्रमाणे यावर्षीही पेण तालुक्यातील खरोशी येथील माऊली कळंबा मातेचा नवरात्र उत्सव ३ ऑक्टोबरपासून सुरू होत असून, सध्या उत्सवाची जय्यत तयारी गावकरी बंधू करत असताना दिसून येत आहेत.

चारशे वर्षांपूर्वीचा इतिहास असलेल्या तुमच्या आमच्या हाकेला धावणारी नवसाला पावणारी जागृत देवस्थान आणि केळीच्या झाडातून प्रकट झालेल्या केळंबा मातेचा नवरात्र उत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा करण्यात येतो. नवरात्रीचे नऊ दिवस लाखो भाविक माऊलीच्या दर्शनासाठी येत असतात. या नवरात्रीच्या नऊ दिवसांमध्ये येणाऱ्या जाणाऱ्या सर्व भाविक भक्तांना चहापाण्याची व्यवस्था, त्यांच्या बसण्याची व्यवस्था, रांगेत येण्याची, जाण्याची व्यवस्था अतिशय उत्तमपणे गावकरी बंधू करतात. या उत्सवाची तयारी म्हणून संपूर्ण गावातील पुरुष, महिला, तरुण माऊलीच्या पायथ्यापासून ते खरोशी फाट्यापर्यंत परिसर स्वच्छता, रस्त्याची डागडुजी त्याचबरोबर आजूबाजूचा निसर्गरम्य परिसर स्वच्छ आणि सुंदर दिसावा यासाठी स्वच्छता अभियानाच्या माध्यमातून संपूर्ण परिसर स्वच्छ केला.

## फरार गुटखा विक्रेता ताब्यात




**। रसायनी । वार्ताहर ।**
शासनाने गुटखा व अंमली पदार्थ यावर बंदी घातली असतानादेखील रसायनी परिसरातील दुकानात गुटखा पुरवठा करणारा आरोपी गेले कित्येक दिवस फरार होता. या आरोपीला रसायनी पोलिसांनी वडगाव मावळ येथून ताब्यात घेतले असून, हनुमान रूपाराम चौधरी (२९) असे या गुटखा विक्रेत्या आरोपीचे नाव आहे. या आरोपीविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. याबाबत अधिक तपास पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक प्रमोद हंबीर करीत आहेत.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## E –TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No :-7000033642**<br>**Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/ e-Tender-35/ 2024-2025.**<br>RFx e-tender for work of providing & fixing of EPR High voltage insulation tape at various substations under EHV (O&M) Division Panvel.<br>**Tender amount Rs. 5,63,623/-,**<br>**EMD amount Rs. 5,636/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **27.09.2024, 18:00 Hrs. to 06.10.2024, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 06.10.2024 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **07.10.2024 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER E.H.V.(O&M) DN. PANVEL**

## महाराष्ट्र शासन

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
Email:-mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (०२१४५) २२२१६७
**निविदा सूचना क्रमांक ४८ सन २०२४-२०२५**

खालील कामासाठी सिलबंद निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड, मु.पो.ता. महाड, जिल्हा. रायगड पिनकोड नं. ४०२३०१ दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ हे महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून बी-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. कोऱ्या निविदा नमुना दिनांक २६/०९/२०२४ रोजी सकाळी १०.०० पासून ते दिनांक ०३/१०/२०२४ रोजी १८.०० वाजे पर्यंत www.mahapwd.gov.in या संकेत स्थळावरुन ऑनलाईन खरेदी करण्यांत येतील. व दिनांक ०४/१०/२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता ऑफलाईन पध्दतीने या कार्यालयात सादर कराव्यात व कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग, महाड हे भरुन पाठविलेल्या निविदा शक्यतो दिनांक ०४/१०/२०२४ रोजी ११.०० वाजता उघडतील. निविदा उघडताना सर्व कंत्राटदारांची उपस्थित रहाने आवश्यक आहे. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखुन ठेवला आहे.

| अनुक्रमांक | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरुन) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे वसाप येथे संरक्षण भिंत बांधणे तालुका महाड, जिल्हा रायगड. (२५१५) | ८१५६३५ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| २ | ग्रा.पं.वसाप (येरुणकरवाडी) ता. महाड येथे स्मशानभूमीलगत संरक्षण भिंत बांधणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. (आ.स्था.वि) | ८४८०४० | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ३ | ग्रा.पं.बसाप (येरुणकरवाडी) ता. महाड येथे नदीघाट सुशोभिकरण करणे, तालुका महाड, जिल्हा रायगड. (आ.स्था.वि) | ८४१४९१ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ४ | मौजे पांगळोली येथे हनुमान मंदिराजवळ संरक्षण भिंत बांधणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. (२५१५) | ८१५९९४ | १०००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ५ | मौजे चिरेखिंड येथे सामाजिक सभागृह बांधणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. (२५१५) | ५७१०८२, | ६००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ६ | मौजे कापडे बु. निवाचीवाडी येथे सामाजिक सभागृह बांधणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड (२५१५) | ८१६१४९ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ७ | मौजे साखर येथे सामाजिक सभागृह बांधणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. (२५१५) | ८१६०६२ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ८ | मौजे आडावळे बिन्हामणकरवाडी येथे सभामंडप बांधणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड.(२५१५) | ४०८१०२. | ५००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग आठ व वरील |
| ९ | मौजे तुर्भे बु. येथे सभामंडप बांधणे. तालुका. पोलादपूर, जिल्हा रायगड. (२५१५) | ८१६१८१ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| १० | मौजे आडावळ बु. येथे सामाजिक सभागृह बांधणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. (२५१५) | ८१५८८० | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ११ | मौजे वझरवाडी सुरबाचीवाडी येथे सामाजिक सभागृह बांधणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. (२५१५) | ५७१२७९ | ६००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| १२ | मौजे दिवील कदमवाडी येथे अंतर्गत रस्ता तयार करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड (२५१५) | ५७१०९१ | ६००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| १३ | मौजे पितळवाडी येथे सभामंडप बांधणे, तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड (२५१५) | ९७९३७७ | १०००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |

टिप :- १) तपशिलवार निविदा सूचना :www.mahapwd.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील.

जा.क्र.मवि/लेशा/निविदा/४५२७
दिनांक : २४/०९/२०२४

सही/-
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

**विमाका/कोवि/२०२४-२०२५/१०६**

## शुद्धीपत्रक

दिनांक २६/०९/२०२४ रोजीच्या दैनिक कृषीवल या वृत्तपत्रामध्ये जाहीर लिलावाच्या जाहिराती प्रसिद्ध झाल्या आहेत. सदर प्रसिद्ध मध्ये जाहीर फेर लिलाव असे नमुद झाले आहे. त्या ऐवजी जाहीर लिलाव असे वाचण्यात यावे तसेच अनामत रक्कम स्विकारण्याची अंतिम मुदत रविवार व सुट्टीचे दिवस वगळून (७ दिवस) दिनांक २५/१०/२०२४ असे नमुद झाले आहे त्या ऐवजी अनामत रक्कम स्विकारण्याची अंतिम मुदत रविवार व सुट्टीचे दिवस वगळून (३० दिवस) दिनांक २५/१०/२०२४ असे वाचण्यात यावे ही विनंती.

**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि, अलिबाग**

## तहसिलदार तथा शेतजमिन न्यायाधिकरण कर्जत यांचे न्यायालयात

पत्ता : नवीन प्रशासकिय भवन, पहिला मजला, पोलिस मैदानाजवळ, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड- ४१०२०१
७०ब दावा क्रमांक : टेनन्सी/एस आर/२९-२०२२

**जाहीर पेपर नोटीस**

१. श्री. अशोक शांताराम जाधव
ता. कर्जत जि.रायगड — अर्जदार
रा. गणेगाव चिंचवली

विरुध्द

१. श्री. सदानंद पांडुरंग नायक — सामनेवाले
रा.बी १०६ साई शक्ती सो.वर्धमान पार्क
तुलीज नाला सोपारा पूर्व ठाणे

तमाम जनतेस तसेच सामनेवाले /प्रतिवादी यांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे गणेगाव चिंचवली, ता. कर्जत जि.रायगड या जमिन मिळकती संदर्भात ७०ब अन्वये अर्ज दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये दिनांक २१/०७/२०२४ रोजी प्रथम सुनावणी घेण्यात आलेली आहे. मात्र सामनेवाले हे या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर दाव्याची पुढील सुनावणी दि. १४/१०/२०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता तहसिल कर्जत, जि. रायगड येथे निश्चित करण्यात आली आहे.

सबब या जाहीर नाटीशीद्वारे सामनेवाले यांना तसेच वरील जमीन मिळकती संबंधित असलेल्या व्यक्तींना ७ दिवसांच्या आत तहसिल कार्यालय कर्जत, जि.रायगड येथे समक्ष येऊन आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल कारावे सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**दावा मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| मौजे. गणेगाव चिंचवली ता. कर्जत जि. रायगड | १३/३ | ०.१५.२० | ०.१४ |

ठिकाण- कर्जत
दिनांक २६/९/२०२४

सही/-
**(धनंजय जाधव)**
**शेतजमिन न्यायाधिरण तथा तहसिलदार कर्जत**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे बामणोली, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. राजदेव करीमन यादव, यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकारणी |
|---|---|---|---|
| बामणोली | ७२ | ०-२५-३०<br>०-००-००<br>०-२५-३० | ४.९४/- |

सदर मिळकतीपैकी श्री. राजदेव करीमन यादव यांचे मालकीची ०-०५-०६ हे. आर. क्षेत्रफळ असलेली मिळकत व त्यामध्ये बांधण्यात आलेली ग्रुप ग्रामपंचायत मान तर्फे झिराड मालमत्ता क्रमांक १९४, क्षेत्रफळ ८५८ चौ. फुट, घरपट्टी रू.१७६७/- ही आर. सी.सी. बांधकामाची घर मिळकत

सदरहू वर्णन केलेली मिळकत निर्वेध, बोजा रहीत असल्याची व ती मिळकत आमचे अशिलांस कायमस्वरूपी विकण्याचा पुर्ण हक्क व अधिकार असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापी सदर मिळकतीत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कबजा, वारसाहक्क, मालकी, एम. ओ. यु. करार, ताबे कब्जा वहीवाटी, रस्ता वहीवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात, प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडुन दिला आहे असे समजुन, गुहीत धरून सदरचा विक्री व्यवहार खरेदीखत करून पूर्ण केला जाईल व यां मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : २६/०९/२०२४

सही /-
**ॲड. अनिकेत हनुमंत गुरव**
पत्ता : श्रीबाग नं. २, अलिबाग, जि. रायगड
ऑफीस : डॉ. केळकर क्लिनीक शेजारी,
शिवाजी महाराज चौक, अलिबाग, जि. रायगड
मोबाईल नं. : ९८५०४०२०५०

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड)
ज.म.र अर्ज ८४/२०२४

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्री. रोहित विजय तांबे
मु. पेढांबे, ता. अलिबाग — अर्जदार
जि. रायगड

विरुध्द

ग्रुप ग्रामपंचायत पेढांबे, — सामनेवाला
ता. अलिबाग, जि. रायगड

सदर या जाहिर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१. अर्जदार हे मौजे पेढांबे, ता. अलिबाग येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांची आजी कै. सुमित्रा सिताराम तांबे यांना मृत्यु दि १७/०८/२०२१ रोजी मौजे पेढांबे, येथील राहत्या घरी झाला होता.

२. मात्र त्यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत पेढांबे येथे केलेली नसल्याने त्यांचा मृत्यु दाखला मिळण्यासाठी मृत्यू नोंदीचे आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत पेढांबे यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन दि.२१/१०/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि.२०/०९/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.

ठिकाण : अलिबाग
तारिख : २०/०९/२०२४

सही/-
**(विक्रम पाटील)**
**तहसिलदार अलिबाग**

## जाहीर नोटीस

सर्वांना या नोटीसने असे कळविणेत येत आहे की, जिल्हा रायगड, तालुका अलिबाग पैकी गाव मुशेत येथील, खालील वर्णनाची मिळकत आजमितीस प्रतिभा प्रदीप कदम यांचे नांवे ७/१२ कडे आहे.

| गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| ५२ | जुना ४<br>नवीन ५ | १-०६-३ | ७.०६ |

आमचे अशिल ओमकार रामेश्वर आमले आणि अन्य यांनी प्रतिभा प्रदिप कदम यांचेविरूध्द अतिक्रमण दूर करून मिळणेकरिता दिवाणी न्यायालयात रे.मु ४५/१९९९ या क्रमांकाचा दावा दाखल केला होता. सदर दाव्याचा निर्णय प्रतिभा प्रदिप कदम यांचे बाजूने झाला असून आमचे अशिल ओमकार रामेश्वर आमले यांनी सदर निर्णयाविरूध्द जिल्हा न्यायालयात दिवाणी अपील दाखल करावयाचे ठरविले आहे. परंतु रे. मु ४५/१९९९ या दाव्याचा हुकूमनामा मे. दिवाणी न्यायालयाकडून अद्याप तयार झालेला नसून त्यामुळे दिवाणी अपील दाखल करावयाचे राहिले आहे. त्यामुळे वर नमूद मिळकतीबाबत चालू असलेला वाद अद्याप संपलेला नाही. त्यामुळे कोणाही व्यक्तिने सदर मिळकतीबाबत कोणताही खरेदी व्यवहार करू नये याकरिता ही जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

तरी गट नंबर ५२/५ या मिळकतीबाबत कोणत्याही व्यक्तिने प्रतिभा प्रदिप कदम वगैरे यांचेसोबत कोणताही व्यवहार करू नये. तसा व्यवहार केल्याचे आढळल्यास आमचे अशिल संबंधित व्यक्तींविरूध्द योग्य ती कायदेशीर कारवाई करतील याची नोंद घ्यावी.

तारीख : २८/०९/२०२४

सही/-
**ॲड. राजेंद्र मधुसूदन कुंटे**
शांतादुर्गा कोऑप. हौसिंग सोसायटी,
मारुती नाका, अलिबाग रायगड.
मोबाईल : ९२७०१६२९२९

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील सुजित नामदेव घरत, रा. धुतुम, रायगड हे खालील वर्णनाची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सुनिल तुकाराम बांदेकर आणि माधवी सुनिल बांदेकर, दोघे ही रा. निलांजनी ३ रा मजला, प्रार्थना समाज रोड विलेपार्ले मुंबई यांचे कडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - वाकणगाव, ता. सुधागड, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | क्षेत्र हे. आर | आकार रू. पैसे |
|---|---|---|
| १२/ ब | २-५३-०० | ०.५० |

पैकी मिळकत मालकाचे क्षेत्र ०-६०-० हे. आर. पैकी ०-२०-० हे. आर.

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक याने आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलाचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ८ (आठ) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : २८/०९/२०२४

सही / -
**ॲड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर
पाली, ता. सुधागड, जि. रायगड
मो. नं. ९४०३३०५२५०

## दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन लि.

**जिल्हा मार्केटिंग अधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग.**
**अल्पमुदतीची निविदा**

शासकिय आधारभूत किंमत धान खरेदी योजने अंतर्गत रायगड जिल्हयांत सन २०२३-२४ मध्ये खरेदी केलेल्या भाताची (धानाची) भरडाई करण्यासाठी जिल्हयातील, लगतच्या व इतर जिल्ह्यातील इच्छुक मिलधारकांकडून सीलबंद लिफाफयामध्ये ऑफर्स मागविण्यांत येत आहेत. इच्छुक मिलधारकांनी फेडरेशनने प्रस्तावित केलेल्या ऑफर्स फॉर्ममध्ये फक्त FRK तांदूळ तयार करण्याच्या ऑफर्स द्याव्यात. भरडाई करावयाच्या भाता संबंधिच्या अटी व शर्ती तसेच ऑफर्स फॉर्म संबंधीत जिल्हा मार्केटिंग अधिकारी कार्यालय, रायगड - अलिबाग तथा सदस्य सचिव जिल्हा भात भरडाई समन्वय समिती यांचेकडे कार्यालयीन वेळेत खालील पत्त्यावर प्राप्त होतील. ऑफर भरण्याचा कालावधी/कार्यक्रम खालील प्रमाणे.

अ) ऑफर्स विक्री कालावधी — दि.२८/०९/२०२४ दुपारी ४ वाजेपर्यंत
ब) ऑफर्स भरण्याची अंतीम तारीख — दि.२८/०९/२०२४ दुपारी ५ वाजेपर्यंत
क) ऑफर उघडण्याची तारीख

**जिल्हा पणन अधिकारी**
**रायगड-अलिबाग.**

पत्ता :
जिल्हा पणन अधिकारी कार्यालय
बाफना बाग बी., रो.हौस नंबर १२,
बिग फ्लॅश हॉटेलच्या मागे, रेवस रोड,
ता.अलिबाग, जि. रायगड.
भ्रमणध्वनी क्र. ९१६८०५९९२५/८४०८८६६६१९

## जाहिर नोटीस

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे किहिम, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची गवतपड जमिन मिळकत ही कायमस्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून व त्या आशयाची बोलणी संदर्भित मिळकतीचे विद्यमान मालक व कब्जेदार श्रीमती पद्मा विजय डिंगे व माझे अशिलांच्या दरम्यान झालेली आहे.

संदर्भित मिळकत ही पूर्णतः निर्वेध, बोजाविरहीत व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालक व कब्जेदाराने माझ्या अशिलांना दिला आहे. या उपरही सदर मिळकतीत अन्य कोणाच्याही, कसल्याही तऱ्हेचे हक्क, अधिकार व हितसंबंध असल्यास तसेच गहाण, दान, बक्षिस, साठेकरार, वहिवाटहक्क, फरोक्तखत असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १० दिवसांच्या कालावधीत लेखी पुराव्यानिशी माझी खात्री पटवून द्यावी.

विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल निम्नलिखीत मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील तदनंतर मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**: मिळकतीचे वर्णन -**

| मौजे | भूमापन क्र. | उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| किहिम ता. अलिबाग, जि. रायगड | २५१ | २/१/८ | ०-२९-७०<br>०-००-४०<br>एकूण ०-३०-१० | २-१४ |

ठिकाण : अलिबाग,
दिनांक : २७/०९/२०२४.

**ॲड सुधाकर पी. प्रभू**
'साईलिला' सी.एच.एस.,
'ए विंग' रूम नं. १०३, चेंढरे,
ता. अलिबाग, रायगड
मोबाईल नं. ९८२२७९६८३०

## जाहिर नोटीस

तमाम लोंकास कळविण्यात येते की, श्री. दत्ताराम महादेव खंडेराव, सज्ञान भारतीय नागरिक, राहणार: तडाली, पो. वर्सोली, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२२०१ यांच्या खुद्दमालकी हक्कातील, ताबेकब्जातील व वहीवाटीतील शेतजमिन मिळकत असून त्या शेतजमिन मिळकतीचा तपशिल खालीलप्रमाणे:-

**शेतजमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे - नागाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड**

| सर्व्हे / हिस्सा नं. | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार(रू. पैसे) |
|---|---|---|
| १६२१ | एकुण क्षेत्र २०-५०-००<br>पैकी श्री. दत्ताराम महादेव खंडेराव यांच्या अविभक्त हिश्श्याचे विक्रीचे क्षेत्र ०३-००-०० | ३०.०० |

वरील शेतजमिन मिळकतीबाबत माझे अशिल यांना वरील इसमांशी विक्रीसंबंधी व्यवहार करण्याची इच्छा आहे. तरी या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर शेतजमिन मिळकत विकण्यापूर्वी ती निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित व निजोखकी असणे आवश्यक आहे. जर सदरहू शेतजमिन मिळकतीवर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास ही जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून योग्य त्या कायदेशीर कागदपत्रांसह (२१) एकवीस दिवसांचे आत खालील पत्त्यावर लेखी पत्रानिशी कळवावे. जर वरील मुदतीत कोणांकडूनही, कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आली नाही तर सदरहू शेतजमिन मिळकतीचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल यांची नोंद घ्यावी, कळावे.


**सही - ॲड. अभिमन्यू जाधव**
पत्ता- अपार्टमेंट क्र. पीएल६ए-४-३
खांदेश्वर अपार्टमेंट, सेक्टर ०१, खांदा कॉलनी,
न्यू पनवेल (प.), ता. पनवेल, जि. रायगड
दिनांक- २६/०९/२०२४

# जेएनपीएचा भराव धोकादायक

## न्हावा-शेवा खाडीचे मुख झाले अरुंद; हरित लवाद न्यायालयात याचिका दाखल

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

**जेएनपीएने ठाण्याची उपखाडी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या न्हावा-शेवा खाडीवर भराव टाकल्याने खाडीचे मुख १५०० मीटर रुंदीवरुन १०० मीटरपर्यंत अरुंद झाले आहे. खाडीचे मुख जवळपास बंद केल्याने समुद्राच्या नैसर्गिक भरतीचे संतुलन व प्रवाह बिघडल्यामुळे विविध जैविकता आणि स्थानिक मासेमारी धोक्यात आली आहे. जेएनपीएच्या या अनागोंदी व मनमानी कारभाराविरोधात राष्ट्रीय हरित लवाद न्यायालयात पर्यावरण संघटनेने याचिका दाखल करून न्यायाची मागणी केली आहे.**



ठाण्याच्या खाडीशी न्हावा-शेवा ही उपखाडी जोडलेली आहे. येथे या खाड्यांच्या मुखाशीच जेएनपीटीएने बंदराचा विस्तार केला आहे. परिसरातील ५२० हेक्टर पारंपरिक खाजण क्षेत्रात दगड-मातीचा भराव टाकून जवळपास ९४ टक्के बंद केले गेले आहे. यामुळे १५०० मीटर रुंदीचे खाडी मुख १०० मीटर इतके अरुंद झाले आहे. याचा विपरीत परिणाम येथील स्थानिक पारंपरिक मच्छिमारांबरोबरच जैवविविधतेवरही झाला आहे. तसेच, न्हावा-माणकटोक खाडीचे मुख जवळपास बंद केल्याने समुद्राच्या नैसर्गिक भरती व सागरी प्रवाहाचे संतुलन बिघडले आहे.

खुल्या अरबी समुद्रातील या खाडी क्षेत्रात येणारे भरतीचे पाणी व नैसर्गिक भरतीचा वेग प्रचंड मंदावला आहे. खुल्या समुद्रातून खाडी क्षेत्रात येणाऱ्या माशांची आवक व पैदासही प्रचंड प्रमाणात घटली आहे. नैसर्गिक प्रवाह खंडित झाल्याने माशांच्या प्रजनन क्षेत्रात व माशांच्या खाद्य क्षेत्रात प्रचंड गाळ जमा झाला. त्याचबरोबर २०० चौरस किलोमीटर परिसरातील कांदळवन क्षेत्रात नैसर्गिक भरतीचे पाणी पोहोचण्यास अडथळा निर्माण झाल्याने खारफुटीच्या वनस्पती मरणपंथाला लागल्या आहेत. यामुळे नैसर्गिक खाजण क्षेत्र नष्ट झाले आहे. समुद्राचे पाणी खाजण क्षेत्र व कांदळवनापर्यंत पोहोचत नसल्याने खाजण क्षेत्रे गाळाने भरून गेली आहेत. यामुळे येथील स्थानिक पारंपरिक मच्छिमारांवर अन्याय झाला आहे. त्यांच्यावर उपासमारीचे संकट उभे राहिले आहे. तसेच, बदलत्या परिस्थितीचा थेट परिणाम येथील जैवविविधतेवर झाला आहे.

**याचिकेचा मुख्य उद्देश..**
**नैसर्गिक भरतीचे पाणी पूर्ववत करणे व २०० चौरस किलोमीटर क्षेत्रात पसरलेला पारंपरिक मासेमार क्षेत्र पुनर्जीवित करणे, परिसरातील खारफुटी वाचविणे, स्थलांतरित मासळी, नष्ट होत असलेली जैवविविधता आणि त्यांचा अधिवास टिकवणे हा या याचिकेचा मुख्य उद्देश आहे.**

नैसर्गिक परिस्थिती पूर्ववत करण्यासाठी पारंपरिक मच्छिमार बचाव सामाजिक कृती समिती व गव्हाण कोळीवाडा मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थेच्यावतीने जेएनपीए, महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट थारिटी, रायगड जिल्हाधिकारी, पर्यावरण विभाग आदींविरोधात राष्ट्रीय हरित लवाद न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. या याचिकेची गंभीरपणे दखल घेऊन हरित न्यायालयाचे न्यायमूर्ती दिनेश कुमार सिंह आणि डॉ. विजय कुलकर्णी यांनी संबंधित विभागाला तातडीने पडताळणी करण्याचे आदेश दिले आहेत.

हरित न्यायालयाच्या आदेशानंतर संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी परिसराची नुकतीच पाहणी केली आहे. या पाहणीनंतर संबंधित मच्छिमार संस्थांनी राष्ट्रीय हरित लवाद न्यायालयाकडे केलेली मागणी न्याय असल्याचा निर्वाळा दिला आहे. तसेच, याप्रकरणी तातडीने तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करण्याच्या प्रस्तावालाही संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी संमती दर्शवली आहे. अशी माहिती महाराष्ट्र स्मॉल स्केल फिश वर्कर्स युनियनचे अध्यक्ष व पर्यावरणवादी नंदकुमार पवार यांनी दिली आहे.

# तक्रारींच्या निवारणासाठी आपले सरकार प्रणाली

### ■ जिल्हाधिकारी किशन जावळे यांची माहिती

**। अलिबाग । वार्ताहर ।**

नागरिकांना त्यांच्या मोबाईल फोन किंवा संगणकाच्या माध्यमातून तक्रार दाखल करण्याची सुविधा प्रदान करण्यासाठी आपले सरकार तक्रार निवारण प्रणाली २.० ची निर्मिती करण्यात आली आहे. यामुळे नागरिकांच्या तक्रारींचे जलदगतीने, सोयीस्कर आणि प्रभावी निवारण करण्यास आपले सरकार तक्रार निवारण प्रणाली उपयुक्त असल्याची माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सोमवारी (दि.२३) जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित प्रशिक्षण शिबिरात दिली.


आपले सरकार प्रणालीमुळे नागरिकांना ऑनलाईन पद्धतीने तक्रार नोंदविता येते. यामुळे तक्रार नोंदविण्यासाठी कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहण्याची गरज भासत नाही. याचबरोबर, तक्रारीच्या सद्य:स्थितीचा पाठपुरावा करता येतो आणि निवारणामुळे समाधान झाले किंवा नाही याबाबतचा अभिप्रायही देण्याची सुविधा प्राप्त होते. ही यंत्रणा कार्यालयाला सर्व तक्रारींचा काळजीपूर्वक पाठपुरावा करून देते आणि प्रत्येक प्रकरणात योग्य कारवाई करण्यात आल्याची खातरजमा करते. प्रशासनाद्वारे नागरिकांच्या तक्रारींचे जलदगतीने, सोईस्कर आणि प्रभावी निवारण करणे हे या पोर्टलचे उद्दिष्ट असून याला सर्व कार्यालयांनी प्राधान्य द्यावे, अशा सूचना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी यावेळी दिल्या.

यावेळी पोलीस अधीक्षक रायगड सोमनाथ घार्गे, अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, उपजिल्हाधिकारी डॉ. रविंद्र शेळके, तहसिलदार महसूल चंद्रसेन पवार, सर्व उपविभागीय अधिकारी व तहसिलदार तसेच इतर सर्व शासकीय विभागांचे प्रमुख आदींची उपस्थिती होती.

# सर्पमित्रांनी दिले सात फुटी अजगराला जीवदान

**। सोगाव । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील कातळपाडा-झिराड येथील नितीन नार्वेकर यांच्या घराजवळच्या शेतात मंगळवारी (दि.२४) दुपारी तीनच्या सुमारास शेतमजुराला चारा कापत असताना भला मोठा सर्प दिसला. याबाबत शेतमालक नितीन नार्वेकर यांना सांगितले असता त्यांनी याठिकाणी जाऊन पाहणी केली. त्यांना तो सर्प नसून अजगर असल्याचे निदर्शनास आले. त्यांनी ही माहिती सर्पमित्रांना दिली. यावेळी सर्पमित्र रुपेश गुरव, तुषार चव्हाण, शिवम सावंत यांनी घटनास्थळी धाव घेऊन तब्बल सात फूट लांब असलेल्या अजगराला सुरक्षितपणे पकडून कनकेश्वर डोंगरावर नैसर्गिक अधिवासात सोडून दिले. याबद्दल सर्पमित्रांचे कौतुक केले जात आहे.



यावेळी सर्पमित्रांनी सांगितले की, मागील काही काळापासून जंगली प्राण्यांचा वावर मानवी वस्तीकडे वाढताना दिसत आहे. जंगल भागात मोठ्या प्रमाणात वृक्षतोड केल्यामुळे व वणवे लावल्यामुळे प्राण्यांचे जंगलातील नैसर्गिक खाद्य नष्ट झाल्याने हे जंगली प्राणी आपल्या खाद्याच्या शोधात मानवी वस्तीकडे फिरकताना दिसत आहेत. यामध्ये प्रामुख्याने सरपटणारे प्राणी, माकडे, बिबट्या, वाघ, तरस, रानडुकरे आदी इतर प्राण्यांचा समावेश आहे. यामध्ये सध्या जास्त प्रमाणात सरपटणारे प्राणी मानवी वस्तीकडे यायला लागले आहेत. याला जंगलात लावलेले वणवे प्रमुख कारण आहे. जंगलातील वणव्यात सरपटणाऱ्या प्राण्यांचे किडे, किटके, मुंग्या हे प्रमुख खाद्य असल्याने तेच जर नष्ट झाले तर हे प्राणी आपसूकच खाद्याच्या शोधात भटकत खाली येतात. हे प्राणी मानवाला कोणताच त्रास देत नाहीत, पण त्यांना डिवचले अथवा डीवचण्यासारखे कृत्य केले तर ते आपल्याला त्रास नक्कीच देऊ शकतात. हे प्राणी जंगलातून वस्तीकडे येऊ नये यासाठी आपल्या परिसरातील जंगल भागाचे संरक्षण करणे ही काळाची गरज आहे. अन्यथा हे हिंस्त्र प्राणी मानवी वस्तीकडे येऊन आपल्या जीवाला धोका पोहोचवू शकतात याची शक्यता नाकारता येत नाही, याबाबत सर्पमित्रांनी चिंता व्यक्त केली आहे.

## मालती बिरगावले यांचे निधन

**। कोलाड । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील तिसे गावचे माजी पोलीस पाटील बाळकृष्ण बिरगावले यांच्या पत्नी मालती बिरगावले यांचे निधन झाले आहे.



निधनसमयी त्या ७६ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात त्यांचे पती, दोन मुले, सुना, नातवंडे व मोठा बिरगावले परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी सोमवारी (दि.३०) सप्टेंबर रोजी तर उत्तरकार्य विधी बुधवार २ ऑक्टोबर रोजी त्यांच्या राहत्या घरी होणार असल्याचे बिरगावले कुटूंबीयांकडून सांगण्यात आले.

# भेंडखळ साकवाचा पाया ढासळला

**। उरण । वार्ताहर ।**

भेंडखळ गावातील खाडीच्या नाल्यावरील साकवाच्या पायाची हळूहळू पडझड सुरू झाली आहे. यामुळे रात्री अपरात्री हा साकव केव्हाही पडून रहदारी करणाऱ्या रहिवाशांच्या जीवाला धोका निर्माण होण्याची भिंती भेडखळ गावातील रहिवासी व्यक्त करत आहेत.



भेंडखळ ग्रामपंचायत हद्दीत सध्या ग्रामपंचायत फंडातून सिडको तसेच इतर शासकीय योजनेच्या माध्यमातून विविध विकास कामे मार्गी लावली जात आहेत. परंतु, रहिवाशांच्या रहदारीसाठी महत्वाचा असलेल्या गावातील खाडीच्या नाल्यावरील साकवाच्या देखभाल दुरुस्तीकडे लक्ष केंद्रित करण्यास कोणाला ही वेळ मिळत नाही. यामुळे साकवाचा पाया हळूहळू कमकुवत होत चालला आहे. ही अशीच परिस्थिती राहिली तर रात्री अपरात्री हा साकव पडून रहदारी करणाऱ्या रहिवाशांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो. याआधी फुंडे व धुतूम ग्रामपंचायत हद्दीतील साकव पडून एका कामगाराचा तसेच मासेमारीसाठी गेलेल्या आदिवाशी बांधवांचा मुत्यू झाल्याची घटना घडली आहे. तरी ती पुनरावृत्ती पुन्हा घडू नये यासाठी या साकवाचे दुरुस्तीचे किंवा नव्याने काम हाती घेण्यात यावे, असे भेडखळ येथील शिवाजी ठाकूर यांचे म्हणणे आहे.

## लोकअदालतीतून प्रलंबित प्रकरणे मार्गी लागणार

**। कल्याण । प्रतिनिधी ।**

कल्याण, भांडुप परिमंडलातील कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित प्रकरणे तसेच वीज बिलाबाबत वाद आणि वीजचोरीच्या दाखलपूर्व व प्रलंबित प्रकरणांचा तडजोडीने निपटारा करण्याची संधी आहे. संबंधित ग्राहकांनी तालुका न्यायालय स्तरावर शनिवारी (दि. २८) आयोजित लोक अदालतीत सहभागी होऊन आपापली प्रकरणे सामोपचाराने निकाली काढावीत, असे आवाहन महावितरणने केले आहे.

## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **वरसोली, रायगड** आदर्श नगर येथे ४.५ गुंठेचे (एकूण ३६ गुंठे), ८ प्लॉट एकत्रित अथवा वेगवेगळे विकणे आहेत. अपेक्षित किंमत ₹.५५ लाख प्रत्येकी, एकत्रित ४.४ कोटी संपूर्ण चेक पेमेन्ट - ९८२२२५७९२९
- **किहीम, रायगड** समुद्रकिनाऱ्यापासून ३५० मीटर अंतरावर ३५० मिटरचा NA प्लॉट विकणे आहे. अपेक्षित किंमत ₹.९० लाख बंगल्यासाठी योग्य - ९८२२२५७९२९
- **चौल, रायगड** मुख्य रस्त्यावर, मुखरी गणपतीजवळ १८ गुंठे बागायत आणि ५५ गुंठे शेती (७३ गुंठे) जमीन एकत्रित विकणे आहे. अपेक्षित किंमत रुपये ७ कोटी - ९८२२२५७९२९
- **अलिबाग-मुंबई हायवेवर पिंपळभाट येथे** ३००० स्क्वे. फूट, हॉल/जागा ऑफिससाठी भाड्याने देणे आहे. गरजूंनी अथवा इच्छुक एजंटने संपर्क करावा. संपर्क- ९२२६३७९८४४/९८२३९२७२८८
- **घरात घरकाम व मुलाची देखभाल** करण्यासाठी केअर टेकर पाहिजे आहे. ठिकाण नागाव. कामाची वेळ सकाळी ९ ते संध्याकाळी ६ , पगार १००००. संपर्क- ७८७५८६६५५५.
- **अलिबागमधील कार्यालयासाठी कर्मचारी आवश्यक आहेत.** ताजे पदवीधर मुलाखतीसाठी येऊ शकतात. संपर्क : ९९२३७५०५४९, वेळ सकाळी ११ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत.
- **वाडगाव येथे कॉटेज सांभाळण्याकरिता केअरटेकर पाहिजे.** संपर्क-९७६२७७७९७५.
- **आमच्या अलिबाग येथील कार्यालयात एका कुशल** टायपिस्टची गरज आहे. उमेदवाराने मराठी आणि इंग्रजी भाषेत उत्तम टायपिंग कौशल्य असावे. संगणकाचे प्राथमिक ज्ञान असणे आवश्यक आहे. इच्छुकांनी खालील पत्त्यावर अर्ज पाठवावा. पत्ता : अष्टगंधा सोसायटी, रायवाडी कॉम्प्लेक्स, चेंढरे, अलिबाग. संपर्क- ७७९८४०५३८३
- **अगस्त्य फाऊंडेशन या नामांकित समाजसेवी संस्थेच्या अलिबाग शाखेत** INSTRUCTOR या पदासाठी मुलाखती चालू आहेत. पात्रता- पदवीधर (BSc/MSc/Bed/Ded/BE) निवड प्रक्रिया- लेखी परीक्षा व मुलाखत. मो. रोहन म्हात्रे- ७९७२२१९३६२, ईश्वर पाईकराव- ८५५२८७७३७४
- **अलिबाग-पिंपळभाट स्वामी समर्थ मठासमोर** श्री प्रकाश अपार्टमेंट मधील २ BHK फ्लॅटस् विकणे आहेत. (प्रत्येक फ्लोअरवर फक्त २ फ्लॅट) संपर्क : ९४२२६९६१३३/९९२३१८४७०१
- **दुकान गाळा भाड्याने देणे आहे.** अलिबाग एसटीस्टँडजवळ ७०३८०९४०८९
- Shop For Sell Near Alibag St Stand 9764548679

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# बोर्लीपंचतन बसस्थानकाच्या दारात चिखल



### नूतन बसस्थानकावर असुविधांची गर्दी

**। दिघी । वार्ताहर ।**

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन येथील बसस्थानकाच्या दारातच चिखल झाल्याने प्रवाशांमध्ये नाराजी पसरली आहे. वाढत्या प्रवाशांच्या गर्दीपुढे हे बसस्थानक समस्यांच्या गर्तेत सापडले आहे.

बोर्लीपंचतन शहरातील नागरिकांना अनेक संघर्षानंतर तब्बल चार वर्षांनी बसस्थानकाचा प्रश्न सोडवण्यात यश मिळाले. यानंतर येथे निवारा शेड उभारण्यात आली. मात्र, कमी क्षेत्रात बांधण्यात आलेल्या बसस्थानकात प्रवाशांना बसण्यासाठी असणारी आसन क्षमता ही पुरेशी नसल्याने बहुतेकवेळा प्रवासी आवारात उभे राहून एसटी बसची वाट पाहत असतात. परंतु, याच जागेत मोठ्या प्रमाणावर असलेल्या चिखलामुळे प्रवासी आणखी त्रस्त झाले आहेत.

### चिखलामुळे गाड्या बसस्थानकाच्या बाहेर

**बसस्थानकाच्या दारातच चिखल झाल्याने येणाऱ्या-जाणाऱ्या बस दूरवर थांबा घेत आहेत. यामुळे शंभर मीटरवर प्रवाशांची गाड्या पकडण्यासाठी चिखल तुडवत धावपळ उडत आहे.**

तालुक्यातील बोर्लीपंचतन हे मध्यवर्ती ठिकाण असून, अत्यंत महत्त्वाचे समजले जाणारे येथील बसस्थानक आहे. मुंबई, ठाणे, पुणे आदी ठिकाणी धावणाऱ्या एसटी बसेसमुळे व पर्यटकांसाठी सोईस्कर असणारे बसस्थानक हे अत्यंत महत्त्वपूर्ण असे मानले जाते. येथे दिवसातून येणाऱ्या-जाणाऱ्या ७८ गाड्यांची नोंद होत असून, शहारांकडे नेहमीच नागरिक प्रवास करत आहेत. असे असतानाही येथे सुविधांचा अभाव नेहमीच ऐकायला मिळत आहे. एसटी महामंडळाचे प्रशासन मात्र या समस्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करते की काय, अशी खंत प्रवाशांमधून व्यक्त होत आहे.

## डॉ. अरुंधती जाधव यांचे निधन

**। सोगाव । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील चोंढी येथील मांडवा लायन्स क्लबचे पदाधिकारी अनिल जाधव यांच्या पत्नी डॉ. अरुंधती जाधव यांचे शनिवारी (दि.२१) चोंढी येथील राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या अंत्यसंस्कारावेळी किहीम सरपंच पिंट्या गायकवाड, आरडीसी बँकेचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप नाईक,



अनिल म्हात्रे, वनगे-एव्हरग्रीन इलेक्ट्रॉनिक, माजी जिल्हा परिषद सदस्य संजय पाटील, तसेच अलिबाग व मांडवा लायन्स क्लबचे पदाधिकारी, वैद्यकीय, राजकीय व सामाजिक तसेच इतर क्षेत्रातील मान्यवरांसह चोंढी पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पती, मुलगी, जावई, असा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी सोमवारी (दि.३०) होणार आहेत, तर तेरावे बुधवार, दि. २ ऑक्टोबर रोजी चोंढी येथील राहत्या घरी होणार आहेत.

# रेवदंडा बसस्थानक समस्यांचे आगार

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

अलिबाग आगाराच्या कार्यक्षेत्रात येत असलेल्या रेवदंडा बस स्थानक समस्यांचे आगार बनले आहे. यामुळे एसटीचे अधिकारी, कर्मचारी, प्रवाशांना अनेक गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. मात्र, या समस्या सोडविण्याकडे एसटी प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याचे प्रवाशांचे म्हणणे आहे. तसेच, बस स्थानकाच्या मुख्य इमारतीची काही ठिकाणी पडझड झाली आहे. खिडक्यांची तावदाने व दरवाजाची स्थिती दयनीय आहे. पिण्याच्या पाण्याची टाकी असली तरी तिच्यासमोर कचरा साचला आहे. तसेच, मागील बाजूला घाणीचे साम्राज्य पसरलेले असून बाह्यवळण मार्गाकडे जाणाऱ्या रस्त्याची उंची वाढल्याने पर्जन्यवृष्टीत बस स्थानकाला डबक्याचे स्वरूप प्राप्त होते. बस स्थानकात दर्शनी व मागील बाजूला खड्डे पडले असून खड्ड्यांत लालपरीच्या चाकाचा भाग रूतत असल्याने बसेस नादुरुस्त होण्याचे प्रमाण वाढले आहे. अलिबाग आगाराने रेवदंडा बस स्थानकातून रेवदंडा, चौल, नागाव व आक्षी या भागातील प्रवाशांना लांब पल्ल्याच्या लालपरी बंद करून वेठीस धरले आहे. मुरूड आगारातून येत असलेल्या लालपरी प्रवाशांनी भरून येत असल्याने वरील चार ठिकाणांच्या प्रवाशांना अलिबाग येथे खासगी वाहनाने प्रवास करावा लागत असून आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. यामुळे व वेळेचा अपव्यय ही होतो. आगारातील चौकशीकक्ष बहुतांशी वेळा बंद असतो, असे प्रवाशांचे म्हणणे आहे.

> **रेवदंडा आगारातील समस्यांबाबत अलिबाग आगारप्रमुख यांना लेखी पत्र दिले असून त्यांनी याबाबत वरिष्ठांकडे पाठपुरावा सुरू असल्याचे आश्वासन दिले आहे.**
> **– देवराज राऊत, वाहतूक नियंत्रक, रेवदंडा बसस्थानक**

### खाद्यतेलाच्या दरात प्रतिकिलो २० ते २५ रूपयांनी वाढ

# महागाईला तेल दरवाढीची फोडणी

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

**गणेशोत्सव संपल्यानंतर काही दिवसांतच नवरात्र, दसरा आणि दिवाळी या मोठ्या सणांची चाहूल लागली आहे. सध्या बाजारात भाज्या, कडधान्यांचे भाव वाढलेले असून, सामान्य नागरिकांचे जगणे कठीण झाले आहे. या भाववाढीमध्ये आता खाद्यतेलांच्या किमतींनीही मोठी उसळी घेतली आहे, ज्यामुळे गृहिणींचे घरखर्चाचे बजेट कोलमडले आहे.**



केंद्र सरकारने रिफाइंड सनफ्लॉवर ऑइल आणि इतर खाद्यतेलांवरील आयात शुल्कात २० टक्क्यांनी वाढ केल्याने खाद्यतेलांच्या किमतीत लक्षणीय वाढ झाली आहे. सोयाबीन, राइस ब्रॅन, वनस्पती, तूप आणि मोहरी तेल यांच्या भावात प्रतिकिलो २० ते २५ रुपयांची वाढ झाली आहे. यामुळे आधीच महागाईच्या विळख्यात अडकलेल्या गृहिणींना आणखी अडचणीत टाकले आहे.

खाद्यतेलांच्या भाववाढीने महागाईची आग आणखी धगधगवली आहे. याचा फटका सण साजरे करणाऱ्या सामान्य नागरिकांना बसणार असून, यामुळे येणाऱ्या दिवसांमध्ये जीवनावश्यक वस्तूंचे भाव आणखी वाढण्याची शक्यता आहे. सणांच्या तोंडावर वाढलेले भाव गणेशोत्सव साजरा करून गृहिणी काहीशा सावरण्याचा प्रयत्न करत असतानाच दसरा, नवरात्र आणि दिवाळी हे महत्त्वाचे सण उंबरठ्यावर आले आहेत. या सणांमध्ये तेलाचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. अशा परिस्थितीत तेलाच्या वाढलेल्या किमतींमुळे सण साजरे करणे सामान्य गृहिणींसाठी कठीण होणार आहे.

> **गेल्या काही दिवसांपासून भाजीपाला आणि कडधान्य कडाडले होते. आता तेलही महागल्याने भाजीला महागाईची फोडणी द्यावी लागणार आहे. या वस्तू स्वस्त होणे गरजेचे आहे.**
> **– रेशमा घरत, गृहिणी**

> **सध्या कडधान्याच्या भावांमध्ये मोठी वाढ झाली आहे. याचबरोबर खाद्यतेलाच्या किंमतीतही प्रतिलीटर १५ ते २० रुपये वाढ झाली असून, पंधरा किलोच्या डब्यांमध्ये ४०० ते ४५० रुपयांची वाढ झाली आहे. दिवसागणिक प्रत्येक गोष्ट महाग होत असल्याने व्यवसायावरही परिणाम होत असून, ग्राहकांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे.**
> **– राजेंद्र गावित, व्यावसायिक**

### व्यावसायिकांनाही मोठा फटका

सोयाबीनचा १५ लीटर डबा, जो पूर्वी १७०० रुपयांना मिळत होता. आता २१०० रुपयांपर्यंत पोहोचला आहे. तब्बल ४०० रुपयांची वाढ झाल्यामुळे लहान हॉटेल, टपरी आणि खानावळ चालक यांनाही याचा मोठा फटका बसत आहे, ज्यामुळे पुढे आणखी भाववाढ होण्याची शक्यता आहे.

### महागाईमुळे जगणे कठीण

महागाईमुळे रस्त्यावरील खड्डे, पेट्रोल-डिझेलचे वाढलेले दर, भाज्या आणि कडधान्याचे वाढलेले भाव, आता खाद्यतेलाच्या भाववाढीने सामान्य लोकांचे जगणे अधिकच कठीण केले आहे.

# फिस्टबॉल आणि वॉलबॉल

रोमन लोकांनी बऱ्याच हटके खेळांचा शोध लावला. 'फिस्टबॉल' ही सुद्धा त्यांचीच निर्मिती. पण याबाबत लोकांना फारशी माहिती नाही. या खेळाच्या स्पर्धांना 'फिस्टिव्हस' म्हणतात. तर खेळाडू 'फिस्ट बॉलर्स' म्हणून ओळखले जातात. जगातल्या २५ देशांमध्ये हा खेळ खेळला जातो. फिस्टबॉल आणि व्हॉलीबॉलमध्ये बरंच साम्य आहे. पण फिस्टबॉल खेळताना मुठी वळवून ठेवायच्या असतात. या मुठींनी किंवा हातांनी बॉल मारता येतो. या खेळात दोन संघ सहभागी होतात. मधोमध जाळी बांधलेली असते. प्रत्येक संघात पाच खेळाडू असतात. प्रतिस्पर्धी संघाने मारलेल्या चेंडूचा टप्पा पडला तरी तो मारता येतो. पाच सेट्सनंतर खेळाचा निकाल लागतो.

फिस्टबॉलची एक आंतरराष्ट्रीय फेडरेशनही आहे. ही फेडरेशन फिस्टबॉलच्या स्पर्धांचं नियमित आयोजन करतं. ऑलिम्पिकमध्ये समावेश नसलेल्या खेळांची स्पर्धा म्हणजे 'वर्ल्ड गेम'मध्ये फिस्टबॉलचा जागतिक विजेता ठरतो.

**फन टाईम**

मुलांनो, तुम्ही बॉल वेगवेगळ्या पद्धतीने खेळता. त्यात भिंतीवर बॉल मारून झेलताना खूप मजा येते. गंमत म्हणून खेळला जाणारा हा खेळ जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचला आहे. सिडनीतल्या रेडफर्न रस्त्यावरून संपूर्ण ऑस्ट्रेलियात आणि तिथून अगदी बीजिंग, व्हेनिसपर्यंत हा खेळ पोहोचला आहे. विविध लीग्ज किंवा चॅप्टरचे खेळाडू तो खेळतात. 'वॉल बॉल' असं या खेळाचं नाव. आपल्या शहरातल्या सार्वजनिक भिंतींवर वॉल बॉल खेळण्यासाठी हे गट नेहमी एकत्र येतात. याचे नियम नेहमीच्या हँडबॉलसारखेच असतात. या खेळात दोनदा टप्पा पाडायला परवानगी नाही. या खेळाचे सिंगल्स आणि डबल्सचे सामने भरवले जातात. तसंच बाद फेऱ्याही असतात. अगदी सोपे नियम, पुरुष आणि महिलांना समान संधी तसंच इतर काही कारणांमुळे वॉल बॉल जगभरात लोकप्रिय झाला आहे.



# ९० मिनिटांत पृथ्वीची एक फेरी?

इंटरनॅशनल स्पेस स्टेशन हे एक मोठे अंतराळयान आहे जे पृथ्वीभोवती फिरते. अंतराळात जाणाऱ्या अंतराळवीरांसाठी हे स्पेस स्टेशन घर म्हणून काम करते. ही आतापर्यंतची सर्वात मोठी फिरती प्रयोगशाळा आहे. पण या स्पेस स्टेशन बद्दल अशा काही गोष्टी आहेत ज्या तुम्हाला माहीत नसतील. परंतु, हे इंटरनॅशनल स्पेस स्टेशन खाली पडणार असल्याचं सातत्यानं म्हटले जात आहे. त्यांची अनेक कारणे आहेत. याचबरोबर याचा नेमका वेग किती आहे आणि पृथ्वीला प्रदक्षिणा घालण्यासाठी त्याला किती वेळ लागतो याबद्दल जाणून घेऊ. इंटरनॅशल स्पेस स्टेशन खाली पडणार असल्याचं सातत्यानं म्हटलं जातंय. त्यांची अनेक कारणे




आहेत. त्यातील वातावरणातील घर्षण आणि गुरुत्वाकर्षण हे महत्त्वाचे कारण आहे. पण आपल्याला घाबरण्याची गरज नाही. कारण इंटरनॅशल स्पेस स्टेशन पृथ्वीवर येण्याची वेळ अजून आलेली नाही. इंटरनॅशल स्पेस स्टेशन पृथ्वीपासून ३७०-४६० किलोमीटर उंचीवर आहे. पण तिथे असलेल्या वातावरणाचा पातळ थर त्याला हळूहळू खाली खेचत आहे. हे स्पेस स्टेशन सरासरी १७,५०० मैल प्रति तास या वेगाने सुमारे २५० मैलांवरून दर ९० मिनिटांनी पृथ्वी भोवती एक प्रदक्षिणा पूर्ण करते. हे इंटरनॅशनल स्पेस स्टेशन पृथ्वीपासून चंद्रापर्यंत जाऊन पुन्हा चंद्रापासून पृथ्वीपर्यंत येण्यासाठी लागणारे अंतर एका दिवसात पार करते. हे स्पेस स्टेशन ज्या उंचीवर आहे तिथले गुरुत्वाकर्षण पृथ्वीच्या पृष्ठभागाच्या ९०% इतके मजबूत आहे. नासाने घोषणा केली की इंटरनॅशल स्पेस स्टेशनचे ऑपरेशन २०३० मध्ये संपेल आणि त्यानंतर ते पॅसिफिक महासागरात पडेल.

**व्हॉट्स न्यू?**

# यूआय, यूएक्स तज्ज्ञ व्हायचंय?

छोट्या मित्रमैत्रिणींनो, तुम्ही बऱ्याच वेबसाईट्स बघत असाल. साईट उघडल्यावर तुमच्यापुढे माहितीचा खजिना खुला होतो. साईट सर्फिंग करताना तुम्हाला काही सूचनांचं पालन करावं लागतं. विविध विभागांमध्ये जावं लागतं. वेबसाईट तयार करताना बरीच मेहनत घ्यावी लागते. त्यांची रचना आकर्षक कशी असेल, याकडे लक्ष द्यावं लागतं. हे काम डिझायनर्स करतात. त्यांना 'यूआय' किंवा 'यूएक्स' डिझायनर्स असं म्हणतात. ही मंडळी ॲप्स आणि साईट्स तयार करतात. त्यांचा वापर करताना अडचणी येऊ नयेत, असा त्यांचा प्रयत्न असतो. या क्षेत्रात सध्या खूप संधी आहेत.

यूआय डिझायनर्स वेबसाईट्स तसंच ॲप्सच्या रंगरुपावर लक्ष केंद्रित करतात. यासोबतच ग्राफिक्स, रंगसंगती आणि त्याचा लोकांवर पडणारा प्रभाव याचाही विचार त्यांना करावा लागतो तर यूएक्स डिझाइनची उपयुक्तता, अनुभव आणि



कार्यक्षमतेच्या दृष्टीने काम करतात. यासाठी त्यांना लोकांचा दृष्टिकोन, आवड जाणून घ्यावी लागते. यात कारकिर्द घडवायची असेल तर यूआय आणि यूएक्स किंवा इंटरॅक्शन डिझाइनमध्ये प्राविण्य मिळवून डिझायनिंगमध्ये पदवी मिळवू शकता. कॉम्प्युटर सायन्सची पदवी मिळवल्यानंतरही तुम्ही या क्षेत्रात येऊ शकता. त्यासाठी तुम्हाला 'ॲडोब फोटोशॉप', 'कोरल ड्रॉ', 'इनडिझाइन'सारख्या सॉफ्टवेअरची माहिती असायला हवी. यासोबतच एचटीएमएल, एक्सएमएल, सीएसएस, जावाचं ज्ञान असेल तर खूपच छान. नॅशनल इन्स्टीट्यूट ऑफ डिझाइन,अहमदाबाद, इंडस्ट्रीअल डिझाइन सेंटर, मुंबई, एनआयएफटी, दिल्ली, यासारख्या संस्थांमधून तुम्ही याचं शिक्षण घेऊ शकता.

**कोण होणार?**

# मला राग येतोय...

मुलांनो, अजय देवगणच्या 'सिंघम २' मधल्या गाण्यातला 'मला राग येतोय...' म्हणणारा मुलगा आठवतोय का? आता त्याला राग का येतो हे आपल्याला माहीत नाही. पण तुमच्या रागाचं काय? मनासारखं झालं नाही की तुम्ही ओरडता, हातपाय आपटता. रूसून बसता. आता चिडल्यावर कोणाचंही स्वतःवर नियंत्रण रहात नाही. मग दार जोरात आपटलं जातं, वस्तू फेकली जाते, आई-बाबांच्या अंगावर तुम्ही ओरडता. आता हे चांगलं आहे का? तर नाही. राग गेल्यावर तुम्हालाही खूप वाईट वाटत असेल. मग राग येऊच नये म्हणून काय करायचं? तर आपल्या रागाला कुत्र्याच्या पिलासारखं वागवायचं! तुम्ही कुत्र्यांच्या पिलांसोबत खेळला असाल. ही पिलं गोड असली तरी इकडे तिकडे धावतात, खोड्या करतात. कधी कोण्याच्या पायात येतात तर कधी बूटच पळवून नेतात. आता तुम्ही कुत्र्याचं पिलू पाळलं तर काय कराल? त्यांना प्रशिक्षण द्याल. घरी आलेल्या पाहुण्यांशी कसं वागायचं हे शिकवाल. अशाच पद्धतीने तुमच्या रागालाही शिकवायचं. या रागाला कुत्र्याचं पिलू समजा. त्याला वळण लावायचं आहे हे लक्षात घ्या. कुत्र्याचं पिलू वाईट नसतं. मोठेपणी ते खूप गुणी कुत्रा होऊ शकतं. फक्त त्याला काही नियम शिकावे लागतील. कसं वागायचं हे ठरवावं लागेल. रागांचंही तसंच आहे. रागालाही नीट वळण लावायला हवं. यासाठी भरपूर शारीरिक हालचाल करा. रागावर नियंत्रण मिळवायचं असेल तर कुस्ती, कराटेला जा. कोणताही खेळ खेळा. यामुळे तुमचा ताण कमी होईल. खूप राग येत असेल तर आई-बाबांशी बोला. ते तुम्हाला मदत करतील. मनातलं बोला. शक्य असेल तर लिहून काढा. स्वतःवर नियंत्रण ठेवा. रागात काही तरी चुकीचं घडणार नाही याची काळजी घ्या.

**हेल्थ वेल्थ**



## दोस्त हे मस्त

### थोर्नी ड्रॅगन



'थोर्नी ड्रॅगन' किंवा 'थोर्नी डेव्हिल' हा पालीच्या प्रजातीचा प्राणी ऑस्ट्रेलियात आढळतो. थोर्नी ड्रॅगनच्या पुढच्या भागावर काटेरी खवले असतात. त्यामुळे त्याचा इतर प्राण्यांपासून बचाव होतो. थोर्नी ड्रॅगनच्या मानेजवळच्या फुगवट्यामुळे त्याची शिकार करायला आलेले प्राणी फसतात. त्यांना ते डोकं वाटतं. दिसायला भयानक असलेला हा प्राणी माणसांना कोणताही त्रास देत नाही. तो मुंग्या आणि वनस्पती खाऊन जगतो.

## खादाडी

### चविष्ट खाखरा कॅनापिस

छोट्यांनो, संध्याकाळी काही तरी चटपटीत खायचं असेल तर खाखरा कॅनापिस हा पदार्थ बनवता येईल. यासाठी १० ते १२ मिनी खाकरे किंवा मोठ्या खाकऱ्याचे मध्यम तुकडे, एका उकडलेल्या बटाट्याचे छोटे तुकडे, बारीक चिरलेला कांदा, जीरेपूड, लाल तिखट, चाट मसाला, पुदिन्याची आणि चिंचेची चटणी, चिरलेली कोथिंबिर, लिंबू, मीठ, शेव आणि दही घ्या. एका भांड्यात बटाटे, कांदा, जीरेपूड, लाल तिखट, थोडं मीठ आणि चाट मसाला घालून हलवून घ्या. त्यात पुदिना, चिंचेची चटणी आणि लिंबाचा रस घाला. नीट मिसळून घ्या. वरून कोथिंबिर घाला. खाखऱ्याचे तुकडे घ्या. त्यावर हे मिश्रण घाला. वरून शेव आणि दही घाला. चवीने खा.



## लाईफस्टाईल

### मोबाईल उशाशी ठेऊन झोपताय?

तुम्ही मोबाईल डोक्याजवळ ठेऊन झोपता का? असं करत असाल तर हा प्रकार लगेच थांबवा. कारण मोबाईलच्या रेडिएशनमुळे तुम्हाला गंभीर आजार होऊ शकतात. स्मार्टफोन, कॉम्प्युटर, टीव्हीच्या निळ्या प्रकाशामुळे झोप येत नाही. त्यामुळे रात्री मोबाईल वापरू नका. एका संशोधनातून ही बाब समोर आली आहे. त्यामुळे याकडे अजिबात दुर्लक्ष करू नका.



## योगा टाईम

### शक्तीपान मुद्रा


शंकराला तिसरा डोळा असतो हे आपण ऐकलं असेल. असाच डोळा माणसांनाही असतो. पण तो गुप्त रुपात. तो सक्रिय करण्यासाठी 'शक्तीपान मुद्रा' करता येईल. विद्यार्थी तसंच बौद्धिक काम करणाऱ्यांनी ही मुद्रा नियमित करायला हवी. या मुद्रेमुळे तिसरा डोळा कार्यान्वित होतो, एकाग्रता वाढते. ही मुद्रा करताना दोन्ही हातांचे अंगठे आणि पहिल्या बोटाचे वरचे भाग जुळवून घ्या. आता उरलेली तीन बोटं दुमडून पंजावर थोडा दाब द्या.



# हिमालयाच्या कुशीतला नेपाळ


नेपाळ हा भारताचा शेजारी देश. त्याच्या दुसऱ्या बाजूला बलाढ्य चीन आहे. जगातलं सर्वात उंच 'माउंट एव्हरेस्ट' शिखर ही नेपाळची ठळक ओळख. विशेष म्हणजे जगातल्या दहा सर्वात उंच शिखरांपैकी आठ या देशात आहेत. हिमालयाच्या कुशीत वसलेला नेपाळ काही वर्षांपूर्वी भूकंपाने हादरला. यामुळे इथे बरंच नुकसान झालं. काठमांडू ही नेपाळची राजधानी. नेपाळी ही अधिकृत भाषा असली तरी इथले लोक हिंदी आणि इंग्रजीही बोलतात. करनाली आणि कोशी या प्रमुख नद्या आहेत.

लुंबिनी हे गौतम बुद्धाचं जन्मस्थान नेपाळमध्ये आहे. अठराव्या शतकाच्या प्रारंभी नेपाळ हा दक्षिण आशियातला एक शक्तीशाली देश होता. पण इंग्रजांनी भारतावर ताबा मिळवला आणि आपली भूमी ब्रिटनला देण्यासाठी



१८१६ मध्ये त्यांच्याकडून संधी करून घेतल्या. नेपाळने या संधींवर सह्या तर केल्या पण १९५१ पर्यंत आपल्या देशात परदेशी नागरिकांच्या येण्यावर बंदी घातली. १८६३ मध्ये ब्रिटिश सर्व्हेअर सर जॉर्ज एव्हरेस्ट यांचं नाव जगातल्या सर्वात मोठ्या शिखराला देण्यात आलं आणि हे शिखर 'माउंट एव्हरेस्ट' म्हणून ओळखलं जाऊ लागलं. स्थानिक शेर्पा त्याला 'चोमोलुंगमा' असं म्हणतात. तर 'सागरमाथा' हा नेपाळी भाषेतला शब्द आहे. सर एडमंड हिलरी आणि शेर्पा तेनसिंग यांनी १९५३ मध्ये पहिल्यांदा 'माउंट एव्हरेस्ट' सर केलं. नेपाळी लोक इंधन म्हणून लाकडाचा वापर करतात. यामुळे जंगलतोड ही इथली मोठी समस्या आहे. यामुळे इथल्या प्राण्यांच्या बऱ्याच प्रजाती धोक्यात आल्या आहेत. वाघ, एकशिंगी गेंडा, बर्फातला बिबट्या आणि गोड्या पाण्यातले डॉल्फिन्स दुर्मीळ होत चालले आहेत. ही वनसंपदा वाचवण्यासाठी नेपाळ सरकार प्रयत्न करत आहे. इथली अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणावर पर्यटनावर अवलंबून आहे.

**सफर देशांची**




# आय क्यू म्हणजे काय?


तुमचा आय.क्यू किती आहे सांगा बरं. बुचकळ्यात पडलात ना प्रश्न ऐकून? पण हा शब्द अनेकदा तुमच्या कानावर पडला असेल. आईबाबांनी तुमचीही आय.क्यु टेस्ट करुन घेतली असेल! ही एक बुद्धीचं मापन करणारी चाचणी आहे. यालाच इंटिलिशन्स कोशंट असं म्हणतात. आल्फ्रेड बिनेट या मानसशास्त्राच्या अभ्यासकानं या चाचणीचा शोध लावला. काही मुलांकडे इतरांपेक्षा जास्त लक्ष देण्याची गरज असते हे लक्षात आल्यानंतर ही मुलं ओळखणं सोपं जाण्यासाठी त्यानं अभ्यास केला आणि अशा प्रकारच्या चाचणीचा उदय झाला. त्याला मदत केली थिओडोर सायमन या सहकाऱ्यानं.



आय.क्यू.टेस्टद्वारे अनुभवांच्या आधारे शिकण्याची, अडचणींवर मात करण्याची आणि नव्या परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता जोखता येते. एखाद्याची बौद्धिक पातळी कळल्यानंतर तिला शिकवण्यासाठी कुठली पद्धती वापरावी, कुठला मार्ग निवडावा हे कळतं. माणसाचा सरासरी आय. क्यू हा कमीत कमी ७० आणि जास्तीत जास्त १३० असतो. ७० पेक्षा कमी आय.क्यू असणाऱ्या व्यक्ती मतिमंद गटात मोडतात तर १३० पेक्षा जास्त आय.क्यू असणाऱ्या व्यक्ती असामान्य बुद्धिमत्ता असलेल्या समजल्या जातात. बौद्धिक पातळी जाणून घेण्यासाठी मानसशास्त्रात सुमारे ६०० चाचण्या आहेत. एखाद्याला विशिष्ट विषयातच रुची असते. त्याचा कल विशिष्ट कलेकडे असतो. हे सर्व या चाचणीतून कळते. म्हणूनच आय.क्यू टेस्ट करुन घेतात आणि त्यावरुनच शिक्षणाची तसेच कारकिर्दीची पुढची दिशा ठरवतात.

**माहीत आहे?**

## ठिपके जुळवा



## ओळखा पाहू...


**जिज्ञासा**

१) लाल रक्तपेशी नसलेला सजीव कोणता?
२) एक ग्रॅम ग्लुकोजमधून किती कॅलरी ऊर्जा मिळते?
३) 'ॲग्रोस्टोलॉजी'मध्ये कशाचा अभ्यास केला जातो?
४) मानवी शरीरात सर्वसाधारणपणे किती स्नायू असतात?
५) जीवनसत्त्वांचा समावेश कोणत्या घटकांमध्ये होतो?
६) माणसाच्या शरीराच्या एकूण वजनात मेंदूच्या वजनाचं प्रमाण किती?
७) जगातलं सर्वात मोठं आखात कोणतं?
८) आपल्या सूर्यमालेतला सर्वात थंड ग्रह कोणता?
९) जगातलं सर्वात मोठं धरण कोणतं?
१०) भारतातला सर्वात मोठा रेल्वेमार्ग कोणता?

उत्तरं : १) गांडूळ २) ४ कॅलरीज ३) गवत ४) ७०० ५) मायक्रो न्यूट्रियंट्स ६) दोन टक्के ७) मेक्सिकोचं आखात ८) नेपच्यून ९) जिनपिंग १ धरण (चीन) १०) दिब्रूगड(आसाम) ते कन्याकुमारी(तमिळनाडू)

# स्मार्ट मिररची जादू

छोट्यांनो, हेअरस्टाईल्स वेगवेगळ्या पद्धतीच्या असतात. विविध प्रकारे केस कापले जातात. आपल्याला यातलं काय चांगलं दिसेल, हे काही केल्या कळत नाही. एखादी स्टाईल आपल्याला शोभून दिसत नसल्याचं केस कापल्यानंतर लक्षात येतं. अशा वेळी काय करायचं? केस पुन्हा वाढेपर्यंत काहीच करता येत नाही. पण आता याची काळजी करायचं नाहीच कारण नाही. 'केअर ओएस' नावाच्या कंपनीने तयार केलेला स्मार्ट मिरर तुमचा हा प्रश्न सोडवणार आहे. या आरशासमोर उभं राहिल्यावर तुमच्या डोक्यावर वेगवेगळ्या प्रकारच्या हेअरस्टाईल्स दिसू लागतील. यापैकी चांगली दिसणारी हेअरस्टाईल कोणती, हे ठरलं की झालं काम. तुम्ही ती स्टाईल करू शकता.



गंमत म्हणजे या आरशामुळे केस व्हर्च्युअली रंगवताही येतात. प्रमुख वैशिष्ट्य सांगायचं तर हा आरसा तुमच्या हालचाली टिपतो. म्हणजे फक्त डोकं हलवलं तरी आरशातली हेअरस्टाईल बदलेल. 'गुगल असिस्टंट'च्या मदतीनेही हा आरसा वापरता येतो. यातल्या 'स्मार्ट जेश्चर इंटरफेस'मुळे तुम्ही वेगवेगळ्या हेअरस्टाईल्स पाहू शकता. नव्या हेअरस्टाईलचा व्हिडिओही रेकॉर्ड करता येईल. तो दाखवून आवडीची हेअरस्टाईल करू शकता. अमेरिकेतल्या लास वेगासमध्ये 'कंझ्युमर इलेक्ट्रॉनिक शो'चं(सीईएस) आयोजन करण्यात आलं होतं. त्यात अशा हटके तंत्रज्ञान असलेल्या वस्तू सादर करण्यात आल्या. पण या स्मार्ट मिररची चर्चा सगळीकडे रंगली होती.

**स्मार्ट गॅझेट्स**

# कलासक्त

**मुंबई साहित्य संघाच्या 'रंभा' या नाटकाद्वारे व्यावसायिक रंगभूमीवर पदार्पण करणाऱ्या सुधा करमरकर यांनी पुढे बालरंगभूमीची मोठी चळवळ उभी केली. नाट्यसंपदेच्या नाटकांतून अनेक उत्तमोत्तम भुमिका करून त्यांनी मोठा नावलौकिक मिळविला. अनेक व्यावसायिक नाटकांचे दिग्दर्शन केले. इतकेच नव्हे तर त्यांनी एकूण ३७ बालनाटकांची निर्मिती केली.**

## सुधा करमरकर

### कल्पक दिग्दर्शिका व सुजाण अभिनेत्री





**शरद कोरडे**

सुधा आमोणकर (करमरकर) यांचा मुंबईत १८ मे १९३४ मध्ये झाला. त्यांचे वडिलांचे मूळ घराणे गोव्यातील असल्याने घराण्यात सर्वांनाच नाटक व नृत्याची आवड होती. त्यांचे वडील तात्या आमोणकर हे गिरगावातील मुंबई साहित्य संघाचे एक खंदे कार्यकर्ते होते व ते साहित्य संघाच्या नाट्यशाखेत कार्यरत होते. सुधाकर त्यांनी लहानपणापासूनच नाट्यसंस्कार केले. त्यांना भरतनाट्याचे शिक्षण दिले. वयाच्या अठराव्या वर्षी त्या भरतनाट्यामध्ये प्रविण झाल्या. त्याचवेळी मुंबई साहित्यसंघाने 'रंभा' हे नाटक रंगभूमीवर आणले. या नाटकात नाटिका रंभेचे काम सुधाताईंनी केले. या नाटकात अभिनय व नृत्याची चमक त्यांनी दाखविल्याने व्यावसायिक रंगभूमीवरील त्यांचे पहिलेच पदार्पण यशस्वी ठरले. एल्फिन्स्टन कॉलेजमधून त्यांनी पदवी संपादन केल्यावर मुंबईच्या जे.जे. स्कूल ऑफ आर्टस्‌मध्ये त्यांनी प्रवेश घेतला. त्यावेळी आंतरमहाविद्यालयीन नाट्यस्पर्धेत त्यांनी आचार्य अत्रे लिखीत 'उद्याचा संसार' हे नाटक त्यांनी सुप्रसिद्ध दिग्दर्शक दामू केंकरे यांच्या दिग्दर्शनाखाली केले व त्यात त्यांना सर्वोत्कृष्ट अभिनयाचे पारितोषिक मिळाले.

सुधाताईंचा पहिल्यापासून बालरंगभूमीकडे ओढा होता. त्यावेळी विंदा करंदीकर, आचार्य अत्रे, पु.ल. देशपांडे, अरविंद व सुलभा देशपांडे आदी मंडळी बालरंगभूमीसाठी लिखाण करीत होती. रत्नाकर मतकरी व वंदना विटणकर हे लेखकही छोट्यांसाठी एकांकिका व बालनाट्ये लिहित असत. सुधाताईंनी यापैकी रत्नाकर मतकरी यांची भेट घेऊन त्यांना बालनाट्य लिहिण्यासाठी उद्युक्त केले. त्यांनी 'मधुमंजिरी' नावाचे नाटक लिहिले व ते साहित्य संघांतून सुधाताईंनी बसविले व त्यात स्वतःही एका चेटकिणीची भूमिका केली. हे नाटक खूप गाजले व त्यातील सुधाताईंची भूमिकाही गाजली. साहित्य संघाने या नाटकाचे खूप प्रयोग केले. पण पुढे बालनाट्याचे आर्थिक गणित जुळले नाही. या नाटकाच्या नेपथ्याचा व कपडेपटाचा खर्च व्यावसायिक नाटकांपेक्षाही जास्त होऊ लागल्याने पुढे हे नाटक साहित्य संघाने थांबवले. दरम्यान सुधाताईंनी अमेरिकेचा दौरा केला. तेथील बालरंगभूमीचा अभ्यास केला. तेथील बालनाट्ये पाहिली. चळवळीतील निर्माते, दिग्दर्शक यांच्याशी चर्चा केली व योग्य पद्धतीने बालनाट्ये कशी सादर करावीत याचा मनोमन आराखडा तयार करून मुंबई गाठली.

नव्या जोमाने बालरंगभूमीची चळवळ सुरू करण्यासाठी त्यांनी स्वतःची 'लिटिल थिएटर' नावाची नाट्यसंस्था २ ऑगस्ट १९५९ या दिवशी स्थापन केली. यावेळी त्यांनी बालनाट्यात छोट्यांसमवेत व्यावसायिक रंगभूमीवरील मोठ्या कलाकारांचाही समावेश करून घेतला. जयंत वाखारकर, लीला हडप, भक्ती बर्वे, ऋजुता देशमुख, सुमन ताटे (भावना) आदी कलाकारांनी सुधा करमरकरांसह बालनाट्यात कामे केली. लिटिल थिएटरने 'कल्लाच्या कांद्याची गोष्ट', 'अलिबाबा आणि चाळीस चोर', 'एका फटक्यात सात', 'सर्कशीत चिमणराव', 'शेंडी दिसते लपून बसा', 'अप्पू अखल्या करी गुदगुल्या', 'सँडीने उडवली दांडी', ची ची चिमणराव फॉ फॉ फॉरेनला, अशी बालनाट्ये सादर केली. यासाठी दिग्दर्शन, नेपथ्य व संगीतही सुधाताई स्वतः करीत असत. पुढे त्यांनी स्वतःची 'सोनाली थिएटर्स' ही व्यावसायिक नाट्यसंस्था सुरू केली. प्रथम पु.ल. देशपांडे यांचे 'तुझे आहे तुजपाशी' हे नाटक दिग्दर्शित करून त्यातील गीता ही भूमिकाही केली. नंतर मात्र त्यांनी प्रभाकर पणशीकर यांच्या नाट्यसंपदेमध्ये प्रवेश केला व अनेक नाटकांतून महत्त्वपूर्ण भूमिका केल्या.




नाट्यसंपदेची स्थापना नटवर्य प्रभाकर पणशीकर यांनी ८ एप्रिल १९६३ साली केली. प्रथम या संस्थेतर्फे वसंत कानेटकर यांचे 'मोहिनी' हे नाटक केले, पण ते अयशस्वी ठरले. त्यानंतर १९६६ मध्ये नाट्यसंपदेने कानेटकरांचे 'अश्रूंची झाली फुले' हे नाटक डॉ. काशिनाथ घाणेकर यांना घेऊन केले. या नाटकात प्राध्यापक विद्यानंदची भूमिका प्रभाकर पणशीकर यांनी व सावित्री ही त्यांच्या पत्नीची भूमिका सुधा करमरकर यांनी केली होती. त्यानंतर कानेटकरांचे 'इथे ओशाळला मृत्यू' या नाटकात डॉ. काशिनाथ घाणेकर यांनी संभाजीची तर सुधा करमरकर यांनी येसूबाईंची व प्रभाकर पणशीकर यांनी औरंगजेबाची भूमिका केली. वरील दोनही नाटके व्यावसायिकदृष्ट्या यशस्वी झाली व गाजली. या नाटकातील येसूबाईंच्या भूमिकेत सुधा करमरकर यांनी येसूबाईंचे काम आपल्या अभिनयाने व धारदार आवाजाने गाजविले. त्यानंतर सुधा करमरकर यांनी कानेटकर यांच्या 'मला काही सांगायचंय' मध्ये यशोधराचे, 'वीज आली धरतीला' मध्ये राणी लक्ष्मीबाईंचे 'बेईमान' मध्ये धनवंतीचे, 'तो राजहंस एक' मध्ये कुंतीचे, 'पुत्रकामेष्टी' मध्ये उर्मिलेचे, 'विकत घेतला न्याय' मध्ये उमाचे, केले. 'विकत घेतला न्याय' हे नाटक मधुकर तोरडमल यांनी 'द व्हिजीट' या जर्मन नाटककार आधारीत लिहिलेले होते व त्यांनीच या नाटकाचे दिग्दर्शन करून त्यातील प्रमुख भूमिकाही केली होती. या नाटकात एका श्रीमंत माणसाने न्याय विकत घेतल्यामुळे आयुष्यातून उठलेली उमा ही तरूणी पुढे संधी मिळताच त्याच गावात येऊन एका निवृत्त न्यायधीशामार्फत पुन्हा स्वतः न्याय विकत घेते असे कथानक असलेल्या नाटकात पीडित महिलेने व नंतर सूडाने पेटलेल्या कठोर रणरागिणीचे काम सुधा करमरकर यांनी प्रचंड ताकदीने केले होते. त्यांच्या अभिनय कारकिर्दीतील ही खूपच महत्त्वाची भूमिका होती. या नाटकात प्रा. मधुकर तोरडमल, जयंत धर्माधिकारी, रवि पटवर्धन, मोहन मुंगी यांनी भूमिका केल्या होत्या.

राजा पारगावकर यांचे 'प्रश्न थोडा नाजूक आहे' हे दुसऱ्या महायुद्धानंतर नागालँडमध्ये घडलेल्या आदिवासी जमात व भारतीय सैन्य यांच्या संघर्षावर आधारीत नाटक नाट्यसंपदेने सुधा करमरकर यांच्या दिग्दर्शनाखाली रंगमंचावर आणले. या नाटकात प्रभाकर पणशीकर, कुलदीप पवार, बिपीन तळपदे, प्रकाश इनामदार यांच्यासह सुधा करमरकर यांनीही या नाटकात भूमिका केली होती. या नाटकातील नागानृत्ये रमेश पुरव यांनी बसविली होती. या नाटकाचे फार प्रयोग झाले नाहीत. या नाटकानंतर नाट्यसंपदेने १९७४ मध्ये ऋषिकेश मुखर्जी यांच्या 'आनंद' या चित्रपटावर आधारीत त्याच नावाचे नाटक जे वि.वा. शिरवाडकर यांनी लिहिले होते, त्या नाट्याचे दिग्दर्शन पणशीकरांनी सुधाताईंवर सोपविले. आनंदच्या भूमिकेसाठी त्यांनी सतीश दुभाषी यांची निवड केली. इतर भूमिकांसाठी कुलदीप पवार, रवि पटवर्धन, अपर्णा पराडेकर यांना घेण्यात आले. या नाटकात दोन गाणी होती ती संगीतकार सुरेंद्र हेंद्रे यांनी संगीतबद्ध केली. हे सुरेंद्र हेंद्रे अलिबागचे मूळ निवासी होते. ज्यांनी पुढे विजय पाटील यांच्यासह 'राम लक्ष्मण' या नावानी अनेक मराठी व हिंदी चित्रपट केले. दुर्दैवाने दादा कोंडकेंच्या दोन चित्रपटांना संगीत दिल्यानंतर त्यांचे अल्पायुष्यातच निधन झाले. मात्र तरीही विजय पाटील यांना संगीतकार म्हणून 'राम लक्ष्मण' हे नाव कायम ठेवले.

सुधा करमरकर यांनी आपल्या अभिनय कारकिर्दीत लढाऊ, खंबीर व कर्तव्यकठोर स्त्रीच्या भूमिका केल्या. त्यांच्या आवाजातील धारदारपणामुळे व अभिनयातील कौशल्यामुळे त्यांनी अनेक भूमिका अजरामर केल्या. आयुष्याच्या उत्तरकाळात त्यांनी नाट्यक्षेत्रातून निवृत्ती घेतल्यानंतर महाराष्ट्र शासनाने नाट्यक्षेत्रातही सर्वोच्च सन्मानाचा 'प्रभाकर पणशीकर' जीवनगौरव पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला. सुधा करमरकर यांचा त्यांच्या वयाच्या ८५ व्या वर्षी ५ फेब्रुवारी २०१८ मध्ये प्रदीर्घ आजारामुळे मृत्यू झाला. ●●

## परमात्मा




**'कृष्णगान'**

**शशिकांत मुद्देबिहाळकर**

**९७६७१५२६०८**

या कवितेत कवीने कान्ह्याला ''परमात्मा'' असे आदरपूर्वक संबोधिले आहे. जणू कवीने स्वतः ला याचक बनून स्वतःसाठी याचना केली आहे, परमात्म्याला तो स्वयं शरण गेला आहे. कवी म्हणतो मला या जगी आसरा नाही देवा, दुःख दारिद्र्याने मी कष्टलो आहे. हिन जातीचा मी तुम्हाला शरण आलो आहे. तुमचा दास खरा पण तुमच्या शिरी मात्र भार झालो आहे. गदा आहे मजजवळ परंतु त्या गदेने हरवावे संकटांना आणि मला तुमचे कृपेने सुख संपदा प्राप्त व्हावी अशी याचना कवीने परमात्म्याला केली आहे. प्रेमपुर्वक तुमची मी नित्य नियमे स्तुती गाईन आणि सदा सर्वदा तुमच्या वचनात एकनिष्ठ राहीन. हाती धरून ढोल आणि सनई, तुमची किर्ती ठाईठाई गाईन. तुमच्या सद्‌कृपा प्रसादाचा डंका चहू बाजूला वाजवीन,

मी हीन जातीत जन्मलो असूनही मोठा भाग्ययवंत आहे. कारण मला पाहता सर्व जण मी कान्ह्याचा खास प्यारा आहे असे लोक म्हणतील. या गोष्टीचा गर्व मी शिरावर वाहीन, आणि प्रेमभावे तुमच्या दारी उभा राहीन, असे मोठ्या अभिमानाने कवी म्हणतो. तूमची शेती वाडी सारी पाहीन आणि गाई गुरांनाही नित्य राखीन, आणि तुम्ही सांगाल ते काम मी आनंदाने करीन आणि तुम्हाला सुखवीन असे कवी म्हणतो. काम करताना काही चुकलेच माझे तर, मला सुचवावे ज्यामुळे मला सुधारता येईल, बागेची नांगरण करण्याची आज्ञा मला द्यावी, आणि वृक्ष वाढविणयासही सांगावे, सर्व काळी माझी कठोर परिक्षा घ्यावी, आणि त्यात माझेकडून चूक झाल्याचे आढळून आले तर, मला खांबाला बांधून आसूडाचा दंडही द्यावा असे कवी म्हणतो. यावरून परमेश्वर कृष्णामध्ये आणि त्याच्या भक्त सवंगड्याममधील नाते किती सहज आणि घरातील होते याची कल्पना येते. या दोहोमधला प्रेमभाव प्रत्ययास येतो. पुढे कवी कृष्णाला सांगतो की, हे सर्व मनातील झाले की माझ्या मुलाबाळांच्या, धर्म पत्नीच्या मुखी खीर कांजी खायला घालीन. सभोवताली जे दिन दुबळे आहेत त्यांची लाज राखाया त्यांना वस्त्रे विकत घेऊन देईन. चार वार कापडाचीच तर गरज असते ना मानवास? अशी पृच्छा तो देवाला करतो. आणखी एक मागणी कवी करतो, तो म्हणतो नऊ दारांची झोपडी असे माझी, तिच्या भोवती वस्ती आहे दुष्ट शत्रूंची, जे नित्य सतावीत असतात मला त्यांना दूर सारून माझे रक्षण कर, तूझे नावही ऐकून अशा चोर, राक्षसांना धाक वाटला पाहिजे, तुझ्या भयाने ते दूर पळून जावेत, त्यांच्या तोंडून शब्दही फुटता कामा नये, त्यांचे हात तू बांधून ठेव आणि माझे संकट निवार अशी विनवणी करून परमात्मा ही कविता इथे संपन्न होते. शंभर वर्षे होऊन गेली कवीला ही कविता तमिळ भाषेत लिहून, पण माणसाचे परमात्म्याशी त्या काळचे मागणे पहा किती साधे होते. एकतर तूझी मनोभावे मी सेवा करेन, माझ्यावर कृपादृष्टी ठेव जेणेकरून माझ्या मुलाबाळांच्या तोंडात मी अन्न घालू शकेन तसेच दिन दुबळ्यांना लाज राखण्यास वस्त्र देऊ शकेन, आणि राक्षसी मनोवृत्तीच्या शत्रूंपासून माझे रक्षण कर आणि संकटाचे निवारण कर त्या बदल्यात मी तुझी शेती सांभाळेन, गाई गुरे राखीन. तो काळ कवितेतून कळतो. परमात्म्याकडे केलेले मागणे आणि त्याच्यावरचे प्रेम किती साधे होते हे समजते.

**(कवी श्री. श्रीप्रकाश अधिकारी)**

## आर.माधवन म्हणजे अष्टपैलू अभिनयाचे 'तारुण्य'!



**हिंदी, तमिळ चित्रपट सृष्टीतील किंचित सावळ्या रंगाचा पण अतिशय देखणा अभिनेता आर. माधवन म्हणजे एका काळात लाखो तरुणींच्या स्वप्नातला राजकुमार असायचा. अतिशय प्रभावी व्यक्तिमत्त्व! आर. माधवन यांनी बरेच तामिळ व हिंदी चित्रपट केले परंतु खरी ओळख झाली ती 'रहेना है तेरे दिल में' या त्रिकोणी प्रेमकथेच्या दमदार चित्रपटातील दमदार अभिनयामुळे. आर. माधवन हा अभिनेता शांत, कधीही कोणत्याही भपकेबाजपणात अडकून पडत नाही. चित्रपट सृष्टीतील तो बरीच वर्षे अभिनय करत आहे पण बऱ्याच वर्षांनंतर पुन्हा एकदा आमिर खान, शर्मन जोशी सोबत 'थ्री इडियट' या सुपरडुपर हीट चित्रपटातील अभिनयाने तर चारचांद लावले.**

**धनंजय शेटये**

या भारतीय नावात रंगनाथन हे नाव आश्रयस्थान आहे आणि त्या व्यक्तीला माधवन या नावाने संबोधले जावे. रंगनाथन माधवन (जन्म १ जून १९७०), आर. माधवन किंवा मॅडी म्हणून ओळखले जाते, हे एक भारतीय अभिनेता, पटकथा लेखक, चित्रपट निर्माता आणि चित्रपट दिग्दर्शक आहेत जे प्रामुख्याने तमिळ आणि हिंदी चित्रपटांमध्ये काम करतात. आर. माधवनच पूर्ण नाव रंगनाथन माधवन असं आहे. त्याचे वडील रंगनाथन अयंगर हे टाटा स्टील येथे मॅनेजमेंट एक्झिक्युटिव्ह होते तर आई सरोजा ही बँक ऑफ इंडियामध्ये मॅनेजर होती. त्याची लहान बहिण देविका ही सॉफ्टवेअर इंजिनिअर आहे. झारखंडमध्येही माधवनवर तमिळ भाषेचेच संस्कार झाले होते. माधवनने त्याची शाळा डी.बी.एम.एस. इंग्लिश स्कूल, जमशेदपूर इथून पूर्ण केलं.

बॉलिवूड म्हटलं की रोमँटिक सिनेमा आलाच आणि रोमँटिक सिनेमा म्हटलं की शाहरूख, सलमान, हृतिक, आमीर हे अभिनेते डोळ्यासमोर येतात. जेव्हा बॉलिवूडमध्ये या अभिनेत्यांच्या सिनेमाचा दबदबा होता तेव्हाच आणखी एका सिनेमानं प्रेक्षकांच्या मनात घर केलं. तो सिनेमा म्हणजे 'रहना है तेरे दिल में.' या सिनेमातली गाणी असोत किंवा पावसाचा सीन असो आजही प्रेक्षकांच्या मनातून त्याची भुरळ गेलेली नाही. 'जरा जरा...' हे गाणं आजही तितकंच मनाला भावतं. अप्रतिम सादरीकरण आहे.

१९९६ मध्ये माधवनने संतोष सिवन यांनी दिग्दर्शित केलेल्या जाहिरातीत काम केलं.

माधवनची ही पहिलीच जाहिरात होती. या जाहिरातीतील काम बघून मणिरत्नम यांनी त्याला 'इरूवर' या सिनेमाच्या स्क्रीन टेस्टसाठी बोलवलं. पण त्याची ऑडिशन बघितल्यावर माधवनचे डोळे या भूमिकेसाठी फार तरूण वाटतात असं म्हणून मणिरत्नम यांनी त्याला नाकारलं होतं. यानंतर एका हिंदी चॅनलच्या एक्झिक्युटिव्हने माधवनला घेतलं आणि माधवनला हिंदी सिरियलमध्ये काम मिळालं. 'साया' या सिरियलमधल्या शेखर या भूमिकेमुळे तो जास्त प्रसिद्ध झाला. 'रहेना है तेरे दिल में' या चित्रपटातील आर.माधवन आणि दिया मिर्झा यांची रोमांटिक जोडी लोकांना प्रचंड भावली. सैफ अली खान सारखा अभिनेता माधवनच्या अभिनयापुढे फिका पडला होता. नुकतीच या सिनेमाला २० वर्षे पूर्ण झाली. खरंतर 'रहेना हे तेरे दिल में' हा सिनेमा म्हणजे 'मिन्नाले' नावाच्या तमिळ सिनेमाचा हा रिकेम होता. या तमिळ सिनेमातही आर. माधवननेच काम केलं होतं. रहना है तेरे दिल में ला बॉक्स ऑफिसवर अपयश मिळालं होतं, पण पुढे जेव्हा हा सिनेमा टीव्हीवर लागायला लागला तेव्हापासून तरूणांमध्ये या सिनेमाची क्रेझ जास्तच वाढली. तरूणांना त्यांचा नवा रोमँटिक हिरो मिळाला होता. या सिनेमातल्या दिया आणि माधवनच्या जोडीला प्रेक्षकांनी खूप पसंत केलं. या सिनेमातली गाणी तर आजही सगळ्यांच्या आवडीची आहेत. त्यानंतर बऱ्याच वर्षांनंतर रंग दे बसंती- २००६ साली आलेल्या राकेश ओमप्रकाश मेहरा यांच्या रंग दे बसंती या सिनेमात माधवनने फ्लाईट लेफ्टनंटचं काम केलं होतं. या सिनेमात तो पाहुणा कलाकार होता. 'गुरू' २००७ साली आलेला गुरू हा सिनेमा धीरुभाई अंबानी यांच्या जीवनावर आधारित सिनेमा होता. या सिनेमात माधवनने एस. गुरूमुर्ती नावाच्या पत्रकाराची भूमिका केली होती. या सिनेमात अमिताभ बच्चन, ऐश्वर्या राय आणि विद्या बालन हे कलाकारही होते. '३ इडियट्स'- २००९ साली आलेला राजकुमार हिरानी दिग्दर्शित सिनेमा ३ इडियट्समध्ये माधवनने फरहान नावाची भूमिका केली होती. बॉक्स ऑफिसवर या सिनेमाने चांगली कमाई केली होती. अशा सदाबहार अभिनेत्याचा अभिनय नेहमीच लाजवाब असतो आणि आर. माधवन हा एक समाजशील माणूस आहे. ●●

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ. चित्रलेखा पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)